मासिक वार्तापत्र • अंक 16 • फेब्रुवारी 2021 • सहयोग मूल्य - रु. 5 • 12 पाने



कामगार
# बिगुल
नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

कोरोना लशीच्या नावाने जनतेच्या फसवणुकीचे राजकारण 5

अय्याशी व भ्रष्टाचाराचे नवे शिखर: सेंट्रल विस्टा प्रकल्प 8

पेट्रोल आणि डिझेलची अभूतपूर्व दरवाढ 12

## लोकशाही-नागरी अधिकारांच्या रक्षणासाठी लढा उभा करा!

### भाजपा पासून ते दुरूस्तीवादी माकप, भाकप कडून जनतेच्या लोकशाही अधिकारांना चिरडण्याचे कारस्थान ओळखा!

दिशा रवी या पर्यावरणवादी कार्यकर्तीच्या अटकेने आणि तिच्यावर भरलेल्या राजद्रोहाच्या खटल्याने पुन्हा एकदा लोकशाही-नागरी अधिकारांच्या पायमल्ली विरोधात देशभरात आवाज बुलंद होत आहेत. भाजपा सारख्या फॅसिस्ट पक्षा पासून तर माकप, भाकप सारख्या दुरुस्तीवादी (मार्क्सवादी क्रांतिकारी सिद्धांतामध्ये 'दुरुस्ती' करून भांडवली विचारांची कास धरणारे, revisionists) नामधारी कम्युनिस्ट पक्षांपर्यंत सर्व सत्ताधाऱ्यांनी लोकशाही व नागरी अधिकारांवरील हल्ले वाढवले आहेत. भांडवली व्यवस्थेचे संकट जसजसे तीव्र होत जाते, तसतसे लोकशाहीचा बुरखा तिला नकोसा होत असतो. फॅसिस्ट भाजपची सरकारेच नाही तर दुरुस्तीवादी माकप, भाकप सारख्या पक्षापर्यंत अशा दमनाची अनेक उदाहरणे समोर आहेत. हे सर्व पक्ष मिळून ज्या भांडवलदार वर्गाच्या सत्तेचे संरक्षण करतात, त्या भांडवलदार वर्गाच्या वाढत्या आर्थिक संकटाचीच अभिव्यक्ती आहे राज्यसत्तेचे वाढते दमनकारी चरित्र.

22 नोव्हेंबर 2020 ला दुरुस्तीवादी भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), भारतीय कम्युनिस्ट पार्टी ह्यांच्या डाव्या लोकशाही आघाडी सरकारने 'केरळ पोलीस अधिनियम' मधील भाग 118(अ) मध्ये 'केरळ पोलीस अधिनियम (दुरुस्ती) अध्यादेश न. 79, 2020' द्वारे बदल केला होता. समाजातील सर्व थरांमधून ह्याचा विरोध झाल्यामुळे दबावात केरळ सरकारला झुकावे लागले व हा अध्यादेश मागे घ्यावा लागला. परंतु अशा अध्यादेशांमधून दुरुस्तीवाद्यांचे भांडवली व्यवस्थेची दुसरी सुरक्षा फळी असण्याचे खरे चरित्र उघडे होते. केरळ सरकारने दावा केला होता की त्यांनी हा अध्यादेश 'सायबर गुन्हे रोखणे' तसेच राज्यातील 'महिला आणि मुलांवरील वाढते सायबर गुन्हे थांबविणे' ह्या उद्देशाने आणला होता. दुरुस्तीवाद्यांच्या ह्या "उदात्त" हेतूचे खरे वास्तव काय आहे ते तपासून बघुयात.

**संपादक मंडळ**

या अध्यादेशाप्रमाणे "जो कोणीही व्यक्ती, कुठल्याही सामाजिक माध्यमांवर एखाद्या व्यक्तीला, समूहाला किंवा वर्गाला धमकावणे, शिवीगाळ करणे, अपमान करणे किंवा त्यांची बदनामी करत असल्यास, ते खोटे असल्याचे निष्पन्न झाल्यास आणि ज्यामुळे अशी व्यक्ती, समूह किंवा त्यांच्या वर्गातील कोणत्याही व्यक्तीचे मन, प्रतिष्ठा किंवा मालमत्तेस इजा होत असेल तर अशा व्यक्तीस दोषी ठरविल्यास त्यास तीन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा किंवा दहा हजार रुपये दंड किंवा दोन्ही दंड होऊ शकतो." तसेच हे केवळ असे लिखाण करणारे किंवा पोस्ट करणाऱ्यांवरच नाही तर जे अशा पोस्ट किंवा मत सामायिक (शेअर) करतात त्यांच्यावरही लागू होईल.

ह्यात खरी मेख इथे आहे की मनाला इजा, प्रतिष्ठेला इजा किंवा कोणाचा अपमान झाला आहे हे कोण ठरवेल? ह्याची व्याख्या कोण करेल? तसेच ह्या अध्यादेशातून हा गुन्हा दखलपात्र बनवल्यामुळे पोलिसांना

पान 6 वर

## सर्व शेतकऱ्यांचे हित आणि मागण्या एक आहेत का?

### धनिक शेतकरी आणि कुलकांपेक्षा सीमांत, छोट्या आणि निम्न-मध्यम शेतकऱ्यांच्या काय मागण्या आहेत?

✍ अभिनव

*शेतकरी कोण आहे? हा सर्वात मुलभूत महत्वाचा प्रश्न आहे.*

जेव्हा आपल्या देशात सामंती जहागिरदारीची व्यवस्था प्रभावी होती, तेव्हा प्रत्येक प्रकारच्या आणि लहान मोठ्या सर्व शेतकऱ्यांचा एक सामाईक शत्रू होता. शेतमजूर आणि वेठबिगार मजुरांचाही तोच सामाईक शत्रू होता. हा शत्रू होता सामंती जमिनदार. सामंती जमिनदार तो जमिनदार आहे, जो फक्त सामान्य शेतकरी लोकसंख्येकडून खंड (कर) वसुली करतो, गावामध्ये त्याच्याकडे सरकारसारखी शक्ती असते, तो फक्त आर्थिक रित्याच लूटत नाही तर त्याची आर्थिक लूट त्याच्या राजकीय वर्चस्वावर आणि मुखत्यारीवर (पाटीलकी, देशमुखी, "चौधराहट") टिकलेली असते. ते आपल्या ऐयाशी आणि ऐशोआरामाच्या गरजेनुसार मनमर्जी खंड वसूल करत. ते आपल्या जमिनीवर बाजारासाठी आणि नफ्यासाठी शेती करवत नसत, तर पूर्णत: शेतकऱ्यांकडून वसूल केल्या जाणाऱ्या खंडावर अवलंबून असत.

हा सामंती जमिनदार धनिक शेतकरी, मध्यम शेतकरी, गरीब शेतकरी आणि काश्तकार, आणि शेतमजूर या सर्वांना लूटत आणि दडपत असे आणि या सर्वांचा सामाईक शत्रू होता. 1957 नंतर देशात भांडवली सत्ता कायम झाल्यानंतर म्हणायला जमिनदारी निर्मूलनाचे कायदे बनले. परंतु याला थोड्या चांगल्या प्रमाणात जम्मू-काश्मिर आणि केरळमध्येच लागू केले गेले; बाकी राज्यांमध्ये खूपच कुचकामी पद्धतीने यांना लागू केले गेले आणि काही राज्यांमध्ये तर नाममात्रच लागू केले गेले. परंतु शेतीला भांडवली रुपात बदलवणे भारताच्या नव्या सत्ताधाऱ्यांसाठी, म्हणजेच औद्योगिक भांडवलदार वर्गासाठी गरजेचे होते. परिणामत: त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नव्या सरकारने या सामंती जमिनदारांनाच भांडवली जमिनदारांमध्ये परिवर्तित होण्याची संधी दिली. भांडवली जमिनदार कोण असतो? भांडवली जमिनदार तो आहे जो भांडवली खंड वसूलतो. भांडवली खंड काय असतो? याला भांडवली जमिनदार आपल्या मर्जीने ठरवू शकत नाही. मग हा खंड ठरतो कसा? भांडवली खंड तीन कारकांनी मिळून ठरतो: संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये नफ्याचा सरासरी दर, वेगवेगळ्या जमिनीच्या तुकड्यांची उत्पादकता व नफ्याचा दर आणि शेतीचे अशा एका संसाधनावर अवलंबून असणे जे की नैसर्गिक आहे आणि मर्यादितही: जमिन. जमिन कोणी बनवली नाही. ती एक नैसर्गिक संसाधन आहे. पण ती मर्यादित आहे आणि भांडवली जमिनदारांची एक वर्ग संपत्ती आहे. जसजसे अन्न आणि इतर शेती उत्पादनांची मागणी वाढते, तसतशी कमी सुपिक जमिनीवरही शेती करणे गरजेचे बनत जाते. या शेती उत्पादनांची मागणीच ठरवते की सर्वात खराब जमिनीवर शेती करणाऱ्या भांडवली शेतकऱ्यालाही सरासरी नफा मिळावा, नाहीतर तो भांडवली जमिनमालकाकडून जमीन भाड्याने घेऊन शेती का करेल? जर त्याला सरासरी नफाच मिळत आहे, आणि तो त्याच्या जमीनीचे भाडे/खंड भांडवली जमिनमालकाला देऊन काढायचा आहे तर तो आपले भांडवल अर्थव्यवस्थेमध्ये इतर कुठे गुंतवेल जिथे त्याला सरासरी नफ्याचा दर प्राप्त होऊ शकेल. यामुळेच शेती उत्पादनाची किंमत सर्वात खराब जमीन आणि सर्वात खराब उत्पादनाच्या स्थितींवरुन ठरते आणि खराबातील खराब जमिनीवर काही अतिरिक्त नफा तेव्हाच मिळू शकतो

पान 9 वर

## बिगारी काम करणाऱ्या कामगारांच्या माथी फक्त गुलामीच !

*(प्रत्येक शहरात दिसणारे मजुर अड्डे वा मजुर नाके वा लेबर चौक नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागा श्रमशक्तीच्या खरेदी विक्रीचे बिभत्स अड्डे आहेत. पुण्यातील दांडेकर पुलाजवळ राहणारे पांडुरंग खुरंगळे या मजुर अड्ड्यावर काम करणाऱ्या साथींनी स्वत:च्याच जीवनाच्या स्थितीचे सांगितलेले हे वार्तांकन.)*

म्हातारपणानं हाडं ठिसूळ झाली तरी अजूनही साथी पांडुरंग भगवान खुरंगळे 1972 च्या दुष्काळापासून पुण्यामधील मांगीरबाबा चौक इथे मजूर अड्ड्यावर राबत आहेत. बांधकामामधील राडा-रोडा उचलणे, वीटभट्टी, खड्डे खोदणे, गवंडयाच्या हाताखाली काम अशा विविध प्रकारची कामं ते ठेकेदारी पद्धतीने करतात. नाक्यावर कायम कामाची अनिश्चितता आहेच शिवाय आठवड्यातून फक्त दोन ते चारच दिवस काम मिळते आणि तेवढ्या भेटलेल्या मजुरीवर पूर्ण आठवडा काटकसर करत काढायचा ही जीवनाची स्थिती. शरीराची पूर्ण झीज होऊनही दिवसाला फक्त 400 ते 500 रुपये मजुरी मिळणार. त्यांच्या शब्दात मजुर अड्ड्यावर काम म्हणजे जणू स्वतःलाच विकणं आणि गळ्याला फास लावणं आहे. जेव्हा हाताला काम नाही तेव्हा पोटात अन्नाचा कण जात नाही आणि पोराबाळांसकट उपाशी पोटी झोपणं तर नित्याचंच. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता नावाची गोष्ट तर कोणाच्या ध्यानीमनीही नाही! कोणत्याही सुरक्षेच्या उपकरणाशिवायच सगळी कामं करावी लागतात.

पांडुरंग यांच्या पाठोपाठ त्यांचा मुलगा आता मजुर अड्ड्यावर हजेरी लावू लागलाय. म्हणजे पिढ्यानपिढ्या बिगारी कामंच नशिबी. परिस्थिती वाईट असल्या कारणामुळे स्वतः ही शिक्षण घेऊ शकले नाही व मुला-मुलींना पण शिक्षण देऊ शकले नाहीत. परिस्थितीमुळे आणि सामाजिक दडपणाखाली वय वर्ष 12 असतानाच चार मुलींचे लग्न झाले. पांडुरंग यांनी सरकार बद्दल निराशा व्यक्त करताना बोलले की सरकारी योजनांचा आम्हाला काहीच फायदा होत नाही. आत्तापर्यंत कोणतीच योजना आमच्यापर्यंत आली नाही. सरकारी योजना फक्त ढोंग आहेत. सरकार कामगारांच्या नावावर योजना काढतं पण त्या कामगारांना परवडणाऱ्या नसतात. कारण स्वतःला कामगार म्हणून सिद्ध करायला, योजनांची कागदपत्र गोळा करायला आणि सरकारी ऑफिसांच्या चकरा मारायला पूर्ण आयुष्य निघून जातं, इतक्या किचकट या योजना असतात. कधी चुकून सरकारी मदत भेटलीच तर मधेच मध्यस्थ दलाल आहेतच पैसे खायला.

मागील वर्षी 2019 सप्टेंबर महिन्यात आलेल्या पुरामुळे पुण्यातील अनेक भागांमध्ये पाणी शिरले. पण सर्वात जास्त हानी झाली ती आंबील ओढ्यालगत असलेल्या झोपडपट्ट्यांमध्ये.पुराने शेकडोंची खरं अक्षरश: वाहून गेली. वर्ष उलटलं तरी मोजक्याच लोकांना नुकसान भरपाई मिळाली. शासनाने केलेली नालेसफाई, लाईट, लाईटीचे खांब, शौचालयांच्या चेंबरची कामे किती निरर्थक आहेत याबद्दल स्थानिक नागरिक म्हणून पांडुरंग तक्रार मांडत होते. दांडेकर पूल परिसरातील सर्वे क्र. 134 वसाहतीमधील शौचालयांची अतिशय वाईट दुरावस्था झालेली आहे. शौचालयांमध्ये पाण्याची सोय नाही, पावसामुळे छत गळत आहे. यापेक्षा गंभीर म्हणजे काही शौचालयांना दरवाजेदेखील नाहीत. दरवाजे नसल्यामुळे महिलांची अतिशय कुचंबणा आणि हाल होत आहेत. विजेचा बल्ब लावण्या इतपतदेखील प्रशासन जागरूक नाही. नियमित साफ-सफाईची कामे वेळेवर होत नाहीत. त्यासाठी स्थानिकांना पैसे देऊन सफाई करून घ्यावी लागत आहे. गेल्यावर्षी आलेल्या पुरातील राडा-रोडा अजून तो तसाच शौचालयांमध्ये पडून आहे. स्थानिक प्रशासन किती जागरूक आहे हे यावरून दिसत आहे! या परिसरातील नागरिकांनी अनेकवेळा तक्रार करून देखील त्याची दखल अजूनपर्यंत घेतली गेली नाही. पुराच्या वेळी चार ते पाच महिने शाळेतच काढावे लागले कारण सगळी घरं उध्वस्त झाली होती. स्थानिक प्रशासनाने आमच्याकडे कसलंही लक्ष दिलं नाही आणि स्थानिक नेतेमंडळी फक्त कामा पुरते मामा आहेत. निवडणूक आली की मत देई पर्यंत हात जोडा आणि काम झालं की तुम्ही आमचे कोण अशी गत आहे.

लॉकडाऊनच्या संपूर्ण काळात तर कुत्रं हाल खात नाही अशी मजूर नाक्यावरच्या कामगारांची स्थिती झाली. एकीकडे काम नाही आणि दुसरीकडे सरकारची वसुली मात्र चालूच. लॉकडाऊनच्या तीन महिन्यांच्या कालावधीत वीजेचे बील सात ते दहा हजार आले! इतके वीजेचे बील भरणार नाही असा नकार दिल्यावर लाईट कापून घेतली गेली. महिनाभर अंधारात दिवस काढावे लागले. अशामध्ये न्याय कुठे मागावा हा प्रश्न आहे!

देशभरातील लाखो मजुर अड्ड्यांवर गोळा होणाऱ्या कोट्य़वधी कामगारांची हीच गत आहे. भांडवली बाजारी व्यवस्थेने माणसाच्या श्रमशक्तीचा खुला बाजार मांडलेले हे मजुर अड्डे मानवी यातनांचा नरक आहेत!

वार्तांकन: सुरज

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

- रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
- अहमदनगर - 9156323976, 9657590491
- पुणे - 9422308125

### 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापानचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

**बिगुल व्हॉट्सॲप चॅनेल**

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सॲप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सॲप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704 (पर्यायी नंबर 9619039793)**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

**कामगार बिगुल**

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय | : | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |




# मुंबईतील मानखुर्द परिसरातील अग्नितांडव नफेखोरीचा खेळ आहे!

✍ **बबन**

5 फेब्रुवारी, शुक्रवार रोजी दुपारी दोनच्या सुमारास मुंबईत मानखुर्द-घाटकोपर लिंक रोडवरील मंडाला झोपडपट्टीला लागूनच असलेल्या गोदामाला भयंकर आग लागून जवळपास पन्नास गोदाम जळून खाक झाले. बाजूलाच घनदाट लोकवस्ती असलेली झोपडपट्टी आहे पण सुदैवाने तिथे कोणतीही दुर्घटना किंवा जीवितहानी झाली नाही. या घटनेनंतर लोकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या वेळेस वाचलो पण दुसऱ्यांदा झाले तर काय होईल या विचाराने चेहऱ्यावर प्रचंड भिती आणि जीव मुठीत घेऊन या ठिकाणी लोक बाहेर रस्त्यावर येऊन उभे होते. अग्निशामक दलाकडून या आगीला नियंत्रणात आणायला 8 ते 10 तासाचा वेळ लागला कारण झोपडपट्टी आणि लहान-लहान गल्ल्या असल्याकारणामुळे घटनास्थळी पोहचलेल्या 20 ते 22 अग्निशामक दलांच्या गाड्यांना आग लागलेल्या ठिकाणापर्यंत पोहोचणे खूप कठीण जात होते. अग्निशामक दलाकडून या आगीला तिसऱ्या स्तराची, म्हणजे भीषण प्रकारची, आग असल्याचे जाहीर केले आहे.

**मंडाला परिसरात लागलेली आग ही दुर्घटना नसून भांडवली व्यवस्थेने घडवून आणलेले अग्नितांडव आहे कारण यामागे नफ्याचे मजबूत गणित आहे.** या परिसरातील जागा ही सरकारी आहे यावर गेल्या 25-30 वर्षापासून घनदाट लोकवस्ती बसायला सुरुवात झाली ती आज प्रचंड जोराने वाढत आहे कारण हातावर पोट घेऊन जीवन जगणाऱ्या कष्टकऱ्यांना राहायला आणि भाड्याला परवडेल अशी जागा म्हणूनच मंडाला भाग ओळखला जातो. या ठिकाणी राहत असलेले लोक प्रामुख्याने नाका कामगार आणि नवी मुंबई सह मुंबई शहरातील उच्चभ्रू आणि कुलीन वर्गांच्या नागरी परिसरात आणि कॉर्पोरेट ऑफिस मध्ये हाउसकीपिंग चे काम करत असतात. पण या इलाक्याची दुसरी ओळख सुद्धा आहे आणि ती म्हणजे याच जागेत सरकारी छत्रछायेत आणि स्थानिक पोलीस, प्रशासकीय अधिकारी आणि राजकारणी यांच्या मदतीने प्रचंड नफा कमावत असलेला माफिया!

**भंगार, डम्पिंग, प्लॅस्टिकचे गोदाम, बेकायदेशीर केमिकल, ज्वलनशील पदार्थ यांचा प्रचंड साठा असल्यामुळे या आगीला वेळेत नियंत्रणात आणणे शक्य झाले नाही पण यात मूळ प्रश्न आहे की हा सर्व साठा इथे आला कसा? असे बेकादेशीर उद्योग कोणत्याही परवानगीशिवाय गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहेत.** स्थानिक नगरसेवक, आमदार, खासदार, पोलीस आणि बीएमसी अधिकाऱ्यांना नियमित हप्ते पोहचवून हा सर्व प्रकार सुरु आहे. वर्षभरात अशा घटना 2-3 तरी होतातच आणि तरी देखील यावर अजून सुद्धा राज्य सरकार गांभीर्याने काहीही करायला तयार नाही. घटना घडल्यावर मिडिया मधून 2 दिवसाच्या चर्चेनंतर मंडाला, मानखुर्दची बातमी वृत्तवाहिन्या आणि वर्तमान पत्रातून गायब होतात आणि त्यावर पुन्हा चर्चा तेव्हाच चालू होते जेव्हा 4-6 महिन्यानंतर पुन्हा अशीच एक आग लागत नाही. कारण ज्या घटनेमध्ये बीएमसी, पर्यावरण विभाग, स्थानिक नगरसेवक, आमदार, खासदार आणि स्थानिक माफिया आणि पोलीस प्रशासन याचे सरळ-सरळ हितसंबंध जोडल्याचे दिसून येते त्या ठिकाणी मिडियाचे काम घडलेल्या घटनेला दुर्घटना म्हणून दाखवण्यापेक्षा जास्त काही शिल्लक राहत नाही. ही जागा राज्य सरकारच्या अखत्यारीत येते असे असतांना या ठिकाणी बेकायदेशीर कारखाने चालवले जातात त्यात प्रचंड मोठ्या प्रमाणात केमिकल आणि इतर ज्वलनशील पदार्थ असतात. आग लागल्या नंतर हा सर्व साठा जाळून खाक झाल तर त्यातील एक भाग तरल पदार्थ असल्यामुळे वाहून बाजूला असलेल्या नाल्याला मिळाला, जो नाला सरळ वाशी खाडीला जाऊन मिळतो. यातून जे पाणी प्रदुषण होते ते अत्यंत भयंकर आहे. असे असून देखील पर्यावरण विभाग आणि संबंधित पर्यावरण मंत्री मुंबई शहरात मधोमध राजरोसपपणे चाललेला प्रकार नजरेआड कसा आणि का करत असावेत? **राज्य सरकार यावर अजून देखील कारवाई करण्यासाठी तत्परता का दाखवत नाही?** ही आग लागल्या नंतर 5 किलोमीटर पर्यंत प्रचंड धुराचे साम्राज्य पसरले होते. यातून होणारे प्रदूषण हे फक्त मानखुर्द-गोवंडी लाच प्रभावित करत नाही तर संपूर्ण मुंबईला प्रदूषित करते. अशात मंडाला येथील आगीमुळे योगायोगाने कोणतीही जीवितहानी झाली नाही पण उद्या तस काही झाले तर? परिसर पाहिल्यावर अशा अग्नितांडवाने शेकडो लोक मारल्या जाण्याची शक्यता उद्या अजिबात नाकारली जाऊ शकत नाही.

अशा प्रकारच्या घटनांमधून **सत्ताधारी, सरकारी यंत्रणेची सर्व अंग, पोलिस, आणि बेकायदेशीर पणे धोकादायक व्यवसाय चालवणारे माफिया यांच्यामधील संगनमत स्पष्टपणे दिसून येते,** आणि सत्तेच्या सर्व अंगांना पोसणाऱ्या माफियांची ताकदही दिसून येते. नफ्यासाठीच्या या जीवघेण्या स्पर्धेमध्ये जीव मात्र जातो आहे तो गरीब कष्टकरी-कामगारांचा.

# नौजवान भारत सभेतर्फे फिरत्या वाचनालयाची सुरुवात

### वाचनसंस्कृती रुजवण्याचा, कष्टकऱ्यांच्या दारापर्यंत ज्ञानाचा झरा पोहोचवण्याचा उपक्रम

✍ प्रवीण एकडे

*एकच शत्रू असे आपुला*
*अज्ञान*
*धरुनी त्याला पिटायाचे*
*आपल्यामधुनी हुसकायाचे*
*- सावित्रीबाई फुले (अज्ञान या कवितेतील एक उतारा )*

नौजवान भारत सभा या क्रांतिकारी युवक संघटनेतर्फे पुणे शहराच्या दांडेकर पूल, कात्रज व इतर विविध भागांमध्ये "फिरत्या वाचनालयाची" सुरुवात केली गेली आहे. या वाचनालया अंतर्गत झोपडवस्तीत राहणाऱ्या कामगार कष्टकऱ्यांच्या घरी जाऊन पुस्तके वितरित केली जात आहेत. ज्ञानाच्या संधीपासून वंचित केल्या गेलेल्या कामगार कष्टकऱ्यांपर्यंत आणि त्यांच्या मुला-मुलींपर्यंत जगातील उत्तमोत्तम साहित्याचा, विज्ञानाचा, कला-संस्कृती आणि मनोरंजनाचा खजिना पोहोवण्यासाठी झोळीमध्ये पुस्तके घेऊन युवक कार्यकर्ते घरापर्यंत पोहोचत आहेत. नौजवान भारत सभेचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन कामगार कष्टकऱ्यांना पुस्तकांबद्दल माहिती देतात, वाचनाचे महत्व समजावून सांगतात. पुस्तक देताना जनते कडून 1 रूपया प्रति पुस्तक किंवा महिन्याला 10 रुपये असा सहयोग ही घेतला जातो. गेले 2 महिने फिरत्या वाचनालयाचे काम अविरतपणे सुरू आहे. विशेषतः स्त्रियांना आणि छोट्या मुला-मुलींना या फिरत्या वाचनालयाच्या माध्यमातून ज्ञानाच्या अथांग सागराची ओळख करून देण्याचे काम ते करत आहेत. वाचनालयाला कामगार कष्टकऱ्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमामागील विचार आणि कार्यपद्धती क्रांतिकारी समाजपरिवर्तनाच्या कामामध्ये एक नवीन प्रयोग आहे आणि अशा प्रयोगांना जागोजागी अजून मोठ्या रुपात राबवण्याची गरज आहे.

मोदी सरकार सत्तेत आल्या पासून राष्ट्रवाद शिकवण्याच्या नावाखाली अतार्किक आणि अवैज्ञानिक शिक्षण अभ्यासक्रमात सामाविष्ट केले जात आहेत. शाळेत भूतविद्या, ज्योतिष्यशास्त्र सारखे विषय समाविष्ट करून समाजात अज्ञानता पसरवली जात आहे. अशात गरज आहे ती जनतेत तार्किक, वैज्ञानिक विचार घेऊन जाण्याची. शहीद भगतसिंह पासून ते सुखदेव, राजगुरू, शिव वर्मा, चंद्रशेखर आजाद यासारख्या असंख्य क्रांतिकारकांचे चरित्र आणि विचार पुस्तकांच्या माध्यमातून नवा विचार नौजवान भारत सभा जनतेत घेऊन जात आहे. फक्त पुस्तक देण्याचेच नाही तर पुस्तकांवर चर्चा घडवण्याचे कामही या वाचन उपक्रमा अंतर्गत केले जात आहे. **लोकचवळीचे रुप असलेल्या या फिरत्या वाचनालयाचे काम हे पूर्णपणे जनतेच्या आर्थिक सहयोगातूनच चालवले जात आहे.**

आजच्या या मानवद्रोही समयी गरज आहे ती भविष्याचा रस्ता दाखवणारे साहित्य कामगार कष्टकऱ्यांमध्ये घेऊन जाण्याची. 'शहीद भगतसिंह' यांच्या शब्दात असे भविष्य जिथे माणसाकडून होणारे माणसाचे शोषण अशक्यप्राय होऊन जाईल. सावित्रीबाई फुले, ज्योतिबा फुले यांनी आपले अवघे आयुष्य समाजातील वंचित घटकांना, स्त्रियांना तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक शिक्षण देण्यात घालवले. अज्ञानाचा फायदा घेऊनच भांडवलदार वर्गाने कामगार कष्टकऱ्यांच्या शोषणाचे काम अविरतपणे सुरू ठेवले आहे. आज या अज्ञानाचाच फायदा घेऊन संघ परिवारासारख्या सांप्रदायिक शक्ती कामगार कष्टकऱ्यांच्या खऱ्या समस्यांपासून लक्ष हटवून त्यांच्यापुढे खोटे शत्रू सादर करत आहेत. कुठे हे शत्रू दलितांच्या रूपात आहेत तर कुठे धार्मिक अल्पसंख्याक, मुस्लिम आणि ख्रिश्चन यांच्या रूपात. या अज्ञानाचा फायदा घेऊनच सांप्रदायिक शक्ती कामगार कष्टकरी वर्गातील एका हिश्श्याला दंगलखोर बनवत आहेत, कामगार कष्टकऱ्यांमध्ये एकी होऊ नये म्हणून त्यांच्यात जाती धर्माचे झगडे लावत आहेत. आज गरज आहे 'शहीद भगतसिंह' यांनी लिहिलेला 'जाती धर्माचे झगडे सोडा खऱ्या लढाईशी नाते जोडा' सारखा लेख कामगार कष्टकऱ्यांमध्ये घेऊन जाण्याची. आज गरज आहे अश्फाक-उल्लां खान, रामप्रसाद बिस्मिल, राजेंद्र लाहिरी, रोशन सिंग यांचा वारसा जनतेत घेऊन जाण्याची.

पितृसत्ताक समाजाने महिलांना नेहमीच दुय्यम स्थान दिले आहे. पितृसत्तेने महिलांना चूल आणि मूल अशा दुहेरी भूमिकेत बांधून ठेवले होते आता या भांडवली व्यवस्थेने महिलांवर चूल-मूल आणि सोबतच नोकरी अशी तिहेरी जबाबदारी टाकली आहे. अनेक महिलांना कामावरून घरी आल्यानंतर घरातील काम आणि मुलांना सांभाळावे लागत असल्याने घरातून बाहेर पडणे अशक्य बनले आहे. फिरत्या वाचनालयाच्या माध्यमातून त्यांच्या पर्यंत साहित्य पोहचत असल्याने महिलांमध्ये वाचनासाठीचा उत्साह वाढत आहे. अनेक महिला आग्रहाने पुस्तक घेतात आणि वाचून झाल्यावर त्यावर चर्चाही करतात. आपल्या मनातील संकोच दूर करून अनेक महिला आता नौजवान भारत सभेच्या वाचनालयात येऊनही पुस्तके वाचायला घेऊन जात आहेत.

भांडवली व्यवस्थेने निर्माण केलेल्या निराशेच्या वातावरणाने अनेक तरुण हताश झाले आहेत. देशात करोडो तरुण आज कामा अभावी बेरोजगारांच्या फौजेत सामील झाले आहेत. निराशेतून अनेक तरुण नशेच्या आहारी जात आहेत, देशात तरुणांच्या आत्महत्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. आज गरज आहे या तरुणांसमोर नव्या समाजनिर्मितीच्या आशा पल्लवीत करण्याची आणि या भांडवली व्यवस्थेचे चरित्र उघडे करण्याची. बेरोजगारी सारख्या प्रश्नांची योग्य समज नसल्यामुळे अनेक तरुण जाती धर्माच्या झगड्यात खोट्या प्रचाराला बळी पडून दंगेखोरांच्या जमातीत सामील होत आहे. आज गरज आहे आपले वैकल्पिक मीडिया उभारून तसेच फिरत्या वाचनालयाच्या माध्यमातून या तरुणांपर्यंत पर्यंत या भांडवली व्यवस्थेने निर्माण केलेल्या प्रश्नांची योग्य समजदार घेऊन जाण्याची.

कामगार कष्टकऱ्यांमधील या भांडवली व्यवस्थेने निर्माण केलेले भ्रम दूर करायचे असतील, तार्किक आणि वैज्ञानिक विचारांचा प्रचार-प्रसार करायचा असेल, योग्य राजकीय समजदारीवर उभे असलेले क्रांतिकारी आंदोलन उभे करायचे असेल तर क्रांतिकारी साहित्याचा प्रचार प्रसार करणे आत्यंतिक आवश्यक आहे. देशभरात या सारख्या असंख्य फिरत्या वाचनालयाचे जाळे निर्माण करणे गरजेचे आहे. मानवी संवेदना, विवेकाला आवाहन करतील असे साहित्य जनतेत घेऊन जाणे गरजेचे आहे. आज कामगार कष्टकऱ्यांपर्यंत असे साहित्य घेऊन जाणे आवश्यक आहे जे या माणसाद्वारे माणसाचे शोषण करवणाऱ्या, अन्यायावर आधारलेल्या शोषणकारी व्यवस्थेविरुध्द जनतेला उद्वेलित करेल आणि न्यायावर आधारित समाजवादी व्यवस्था निर्माण करण्यासाठी शिक्षित करेल.

## अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर वाढते हल्ले, पत्रकारांचे दमन

# भांडवली लोकशाहीचा बुरखा फाडणाऱ्या घटना

✍अभिजित

देशातील आर्थिक संकट जसजसे तीव्र होत आहे, आणि दीर्घकालीक संकटात परिवर्तित होत आहे, शासक वर्गाचे दमन सुद्धा वाढत आहे. सन 2020 मध्ये आणि आता 2021 मध्ये भारतात सर्वत्र पत्रकारांवर मोठ्या प्रमाणात खटले दाखल केले गेले, आणि राज्यसत्तेद्वारे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरचा हल्ला तीव्र झाला. **पत्रकारांवर राजद्रोहापासून ते शांतताभंग, दंगल भडकावणे, दहशतवादापर्यंत विविध आरोपांखाली खटले भरले गेले आहेत.** देशभरात झालेल्या अशा घटनांकडे एक नजर टाकूयात आणि त्यानंतर याची कारणे समजून घेऊयात.

चालू असलेले शेतकरी आंदोलन हे निश्चितपणे धनिक शेतकऱ्यांचे, कुलकांच्या मागण्यांचे आंदोलन आहे, परंतु आंदोलनाचा लोकशाही अधिकार देशामध्ये सर्व जनतेला आहे आणि आंदोलनाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याचा अधिकार सर्व प्रसारमाध्यमांना आहे. तरीही नुकतेच जानेवारीत दिल्लीमध्ये चालू असलेल्या **शेतकरी आंदोलनावर हल्ला करणाऱ्या स्थानिकांबद्दल वार्तांकन करणारे पत्रकार मनदीप पुनिया यांना सिंघू येथे दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे.** त्याच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी स्वत:च तक्रार दिली आहे. तक्रारकर्ते, साक्षीदार आणि पीडित असे सर्वजण पोलिसच आहेत! चालू असलेल्या आंदोलनाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारावर आंदोलन भडकावण्याचा आरोप पोलिसांनी लावला आहे. या घटनेविरोधात देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटली आणि न्यायालयाने मनदीप यांना जामिनावर सोडले आहे.

**उत्तरप्रदेशात हाथरस येथे झालेल्या सामुहिक बलात्काराच्या प्रकरणाच्या विरोधात संपूर्ण देशभरात अनेक आंदोलने झाली. या घटनेची बातमी बनवण्यासाठी तेथे जात असलेल्या, *अझिमुखम या मल्याळी वेबसाईट करिता लिहिणारे* पत्रकार सिद्दीक कप्पन यांना मथुरा येथे ऑक्टोबर 2020 मध्ये उत्तरप्रदेश पोलिसांनी यु.ए.पी.ए. सारख्या लोकशाही विरोधी काळ्या कायद्याअंतर्गत अटक केली आणि राजद्रोहाचा खटला भरला आहे. कप्पन यांना जामीन देण्यासही कोर्टांनी नकार दिला आहे आणि आजारी आईला भेटायला जाण्यासाठी सुद्धा जामीन नाकारला जात आहे. कप्पनच्या अटकेविरोधात केरळमधील कार्यरत पत्रकारांच्या संघाने सर्वोच्च न्यायालयापर्यंत दरवाजे ठोठावले आहेत, आणि देशभरातील पत्रकारांनी अटके विरोधात निदर्शने केली आहेत, परंतु कप्पन अजूनही तुरुंगातच आहे.**

**जानेवारी 2021 मध्ये नेहा दिक्षित या मुक्त पत्रकार महिलेने ट्वीटरवर जाहीर केले की सप्टेंबर 2020 पासून काही लोक तिचा पाठलाग करत आहेत आणि ती देत असलेल्या बातम्यांच्या कारणाने बलात्कार, ॲसिड हल्ला, आणि जीवे मारण्याच्या धमक्या तिला दिल्या जात आहेत. 25 जानेवारी रोजी कोणीतरी तिच्या घरात घुसण्याचाही प्रयत्न केला असे तिने जाहीर केले आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की नेहा दिक्षित या बऱ्याच काळापासून पोलिसांद्वारे मानवी अधिकारांचे हनन, खोट्या केसेस दाखल करणे, पोलिसांद्वारे कायदाबाह्य खून अशा विषयांवर लक्षणीय काम करत आहेत आणि उजव्या विचारांच्या संघटनांकडून धमक्यांना तोंड देत आहेत.**

उदारवादी पत्रकार सिद्धार्थ वरदराजन यांनी दिल्लीमध्ये चालू असलेल्या शेतकरी आंदोलनात ट्रॅक्टर चालवताना मृत्यू झालेल्या नवरीत सिंह या शेतकऱ्याच्या आजोबाने केलेल्या वक्तव्याच्या आधारावर, तो मृत्यू गोळी लागून झाला असे **ट्वीट केल्याबद्दल त्यांच्यावर उत्तरप्रदेशामध्ये एफ.आय.आर.** दाखल करण्यात आला आहे. याच संदर्भामध्ये दिल्ली पोलिसांनी कॉंग्रेस नेते शशी थरूर, पत्रकार राजदीप सरदेसाई, नॅशनल हेराल्डचे म्रिनाल पांडे, कौमी आवाजचे जफर आगा, काराव्हानचे परेश नाथ, अनंत नाथ आणि विनोद जोस यांच्या वरही समाजात दुही माजवणे, शांतताभंगाचा प्रयत्न, आणि गुन्हेगारी षडयंत्राचे गुन्हे दाखल केले आहेत.



**अर्णब गोस्वामी या सत्ताधारी वर्गाच्या भ्याड दलाल पत्रकाराला सर्वोच्च न्यायालयाने विशेष वागणूक देत तातडीने जामीन दिल्याविरोधात देशभरात प्रतिक्रिया उमटल्या.** याच संदर्भात 25 वर्षीय कार्टूनिस्ट रचिता तनेजा हिने केलेल्या ट्वीटमुळे सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होत आहे असे म्हणत तिच्यावर न्यायालयीन अवमानाचा खटला भरला गेला आहे. अर्णब गोस्वामी प्रकरणातच ट्वीट केल्याबद्दल **कुणाल कामरा या व्यावसायिक हास्य-कलाकारावर 20 नोव्हेंबर रोजी न्यायालयीन अवमानाचा खटला भरला गेला** आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये मोदी सरकारचे वकील ॲटर्नी जनरल वेणूगोपाल यांनी खटला भरण्याची परवानगी दिली आहे. याच प्रकारच्या आणखी एका प्रकरणात जानेवारी 2021 मध्ये **मुनव्वर फारुकी या हास्य-कलाकारावर** भाजप आमदाराच्या तक्रारीवरून त्याने न केलेल्या विनोदासाठी, तो धर्मावर विनोद करण्याची शक्यता आहे याच आधारावर मध्यप्रदेश मध्ये खटला भरण्यात आला आणि सर्वोच्च न्यायालयात जाऊनच त्याला जामीन मिळू शकला आहे!

**ईशान्य भारत आणि जम्मू-काश्मिर मध्ये तर अशाप्रकारचे दमन नित्याचेच आहे.** भाजपचेच राज्य असलेल्या मणिपूरमध्ये 17 जानेवारीला पाओजेल छाओबा आणि धिरेन सदोक्पाम या 'फ्रंटीयर मणिपुर' नियतकालिकाच्या दोन वरिष्ठ पत्रकारांना अटक करून त्यांच्यावर यु.ए.पी.ए. या तथाकथित 'दहशतवादी' विरोधी कायद्याखाली गुन्हा दाखल केला गेला. पत्रकारांनी एक लेख छापताना चूक झाली असे कबूल केल्यामुळे त्यांना सोडले गेले आहे. मणिपुरमध्ये अशाप्रकारचे खटले दाखल होणे नवीन नाही. नजिकच्या इतिहासातील काही घटना पाहूयात. गेल्या वर्षी जुलै मध्ये पत्रकार एरेंडो लैचोंबाम यावर अमित शहां आणि पूर्वाश्रमी राजा असलेल्या स्थानिक खासदाराच्या विरोधात फेसबुक पोस्ट केल्याप्रकरणी राजद्रोहाचा आणि दंगलीला चिथावणी देण्याच गुन्हा दाखल केला गेला. त्या अगोदर सुद्धा जानेवारी 2020 मध्ये मणिपुर पोलिस खोट्या व्हिडिओ विरोधात कारवाई करत नाहीत अशी पोस्ट केल्याबद्दल त्यांना अटक केली गेली होती! याशिवाय वरिष्ठ पत्रकार किशोरचंद्र वांगखेम यांना नोव्हेंबर 2018 मध्ये नरेंद्र मोदी आणि संघाच्या विरोधात व्हिडीओ पोस्ट केल्याच्या आरोपाखाली राजद्रोहाचे कलम लावून अटक केली गेली होती. कोर्टाने सुटका केल्यानंतर पुन्हा राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक करून त्यांना दीर्घकाळ अटकेत ठेवले गेले. शेवटी एप्रिल 2019 मध्ये मणिपुर हायकोर्टाने त्यांची सुटका केली.

अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर होत असलेला हा हल्ला आता फेसबुक आणि इतर समाजमाध्यमांपर्यंतही वेगाने फोफावत आहे. 11 ऑक्टोबर 2020 रोजी फेसबुकने 'अथेइस्ट रिपब्लिक' (नास्तिकांचे गणतंत्र) म्हणवल्या जाणाऱ्या फेसबुक पेजवर बंदी आणली. हिंदुत्ववादी गटांनी या पेज विरोधात दिलेल्या तक्रारींनंतर सरकारने दिलेल्या निर्देशांवरून ही कारवाई केली गेली. अशाच प्रकारची बंदी एन.आर.सी., सी.ए.ए. विरोधातील आंदोलनाच्या विविध पानांवरही आणली गेली होती आणि चालू असलेल्या शेतकरी आंदोलनाच्या विविध पानांवरही फेसबुकने कारवाई केल्याचे दिसून येते.

**कोरोना काळातही पत्रकारांचे दमन**

कोरोना लॉकडाऊनच्या काळातही अनेक पत्रकारांवर खटले दाखल केले गेले. गुजरातमध्ये 'फेस ऑफ नेशन' चे संपादक धवल पटेल यांनी **गुजरातचे मुख्यमंत्री बदलले जाण्याच्या शक्यतेबद्दल बातमी दिली होती. या 'गुन्ह्या'बद्दल** त्यांच्यावर मे 2020 मध्ये राजद्रोहाचा आणि खोट्या बातम्या पसरवण्याचा खटला भरला गेला. एप्रिल 2020 मध्ये अंदमान, निकोबार बेटांवर कोव्हिड संबंधी मानके योग्य प्रकारे लागू न केल्याबद्दल प्रशासनाला प्रश्न विचारले असता खोटी माहिती पसरवणे, अविश्वास निर्माण करणे, रोग पसरवणे असे आरोप लावून 'लाईट ऑफ अंदमान्स' या नियतकालिकाचे पत्रकार झुबेर अहमद यांच्यावर खटले दाखल केले गेले. तामिळनाडू मध्ये 'सिंप्लिसिटी' या ऑनलाईन न्यूज पोर्टलचे संस्थापक पांडीयन यांच्यावर सरकारी अधिकाऱ्यांचे आदेश न मानणे, जनतेला चुकीचे कृत्य करण्यास प्रोत्साहन देणे, इत्यादी आरोपांखाली गुन्हा दाखल केला गेला. त्यांची चूक ही होती की त्यांनी कोरोना काळत होत असलेल्या **अन्न-वितरणाच्या काळाबाजारा विरोधात आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या दुर्गतीबद्दल लिहिण्याचे काम केले होते!** हिमाचल प्रदेशातील ओम शर्मा या 'दिव्य हिमाचल' च्या पत्रकारावर लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या **कामगारांच्या हलाखीच्या स्थितीबद्दल, त्यांना राशन मिळत नसल्याचे वार्तांकन केल्याची शिक्षा म्हणून खोटी बातमी दिल्याचा गुन्हा दाखल केला गेला.** इतकेच नाही तर जगत बैंस या न्यूज18 हिमाचलच्या पत्रकारावर तर अशाच पद्धतीने तीन गुन्हे दाखल केले गेले, डलहौसीच्या विशाल आनंद यांच्यावर दोनत आणि मंडी येथील अश्वानी सैनींवर तर पाच गुन्हे दाखल केले गेले. हे सर्व गुन्हे त्यांनी दिलेल्या कामगारांना राशन न मिळाल्याच्या अशाच प्रकारच्या बातम्यांचे निमित्त करून दाखल केले गेले. जम्मू-काश्मिरमध्ये सुद्धा अनेक पत्रकारांवर कोव्हिड लॉकडाऊन काळात गुन्हे दाखल केले गेले. 11 एप्रिल 2020 रोजी 'काश्मिर ऑब्झर्वर'च्या मुश्ताक गनई यांना वार्तांकन करताना पोलिसांनी थोबाडीत मारले, लाठ्या मारल्या आणि अटक केली. उत्तरप्रदेशामध्ये तर अशाप्रकारच्या आठ घटनांची नोंद झाली आहे. उदाहरणार्थ, 26 मार्च रोजी **मुसहर या अत्यंत गरीब जातसमुहातील लोकांना गवत खाऊन जगावे लागत आहे अशी 'खोटी' बातमी दिल्याच्या आरोपावरून** सुभाष राय आणि विजय विनीत या पत्रकारांना नोटीस बजावल्या गेल्या. एका अंदाजानुसार कोव्हिड लॉकडाऊन काळात आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर केल्याची शिक्षा म्हणून एकूण 55 पत्रकारांना अटक, धमक्या आणि खटल्यांना तोंड द्यावे लागले आहे. यापैकी सर्वाधिक खटले उत्तरप्रदेश, हिमाचल प्रदेश, आणि जम्मू-काश्मिर या भाजप शासित राज्यांमध्ये दाखल झाले आहेत. अर्थात गैर-भाजप राज्य सुद्धा मागे नाहीत. **महाराष्ट्रामध्ये, जेथे शिवसेना-राष्ट्रवादी-कॉंग्रेसचे सरकार आहे, तेथे, दुसऱ्या एका रिपोर्टनुसार प्रशासनाचे अपयश दाखवणाऱ्या 15 पत्रकारांवर खटले दाखल केले गेले.** कॉंग्रेस शासित **छत्तीसगढ मध्ये पत्रकारांवर कोव्हिड काळात आरोप, धमक्यांची किमान 12 प्रकरणे** घडली आहेत आणि कॉंग्रेसच्याच 2 वर्षांच्या काळात 35 पत्रकारांवर खटले भरले गेले आहेत. तृणमूल कॉंग्रेसच्या **ममता बॅनर्जींच्या पश्चिम बंगाल** मध्ये कोव्हिड मदत निधी वाटप घोटाळ्याची बातमी देणाऱ्या **दोन पत्रकारांवर गुन्हे दाखल** झाले आहेत आणि तृणमूल कॉंग्रेसच्या आमदारांनी लाच घेतानाचा व्हिडीओ बनवल्याबद्दल पाच पत्रकारांची अटक न्यायालयाच्या आदेशामुळे टळली आहे. भाजप शासित त्रिपुरामध्ये पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांविरोधात पत्रकारांना आंदोलन करावे लागले ही स्थिती झाली आहे.

पान 8 वर



## कोरोना लशीच्या नावाने जनतेच्या फसवणुकीचे राजकारण: नफ्यासाठी जनतेला बनवले 'गिनी पिग'

✍पूजा

कोरोना लॉकडाऊनच्या काळात प्रधानमंत्री मोदी व त्यांच्या अंधभक्तांनी विज्ञानाला खुंटीवर टांगत जगभरात स्वतःचे फक्त हसूच करवून घेतले नाही तर देशातील कामगार-कष्टकरी, गरीब जनतेचे आयुष्य देखील दावणीला लावले. अर्थव्यवस्था ठप्प झाली, म्हणून जगभरातील भांडवलदार कोरोनासंकटापासून वाचण्याचा जलद मार्ग शोधण्यासाठी त्यांच्या सरकारांची गळचेपी करू लागलीत, ज्याचा परिणाम म्हणून एरवी नफा होत नसल्याने लसींच्या संशोधनावर पैसा न लावणाऱ्या जगभरातील नफेखोर फार्मा कंपनींची शर्यत सुरू झाली! लस आणि औषधं शोधण्याची! नफ्याचे राजकारण, अपप्रचार, अवैज्ञानिक दृष्टिकोन, स्पर्धा, बाजार, अपारदर्शकता, लाखोंच्या संख्येने झालेले मृत्यु ह्या सर्व आघातांनंतर भांडवलाच्या सेवेत असलेले आजचे विज्ञान कोरोना लसीपर्यंत येऊन पोहचले. आता प्रश्न आहे की ही लस का, कुणासाठी आणि लसीबद्दल असलेली भिती किती खरी?

**लस म्हणजे काय?**

आपण सुरवात करूयात त्या काळापासून जेव्हा साथीच्या रोगांमुळे असंख्य लोक किड्या-मुंग्यांप्रमाणे मृत्युमुखी पडत. मनुष्य हतबल होऊन साथीच्या रोगांसमोर हार मानत. 18-19 च्या शतकात इंग्लड मध्ये एडवर्ड जेन्नर ह्या वैज्ञानिकाने सुमारे 10,000 वर्षांपासून मानवजातीला छळणाऱ्या देवीच्या रोगावर लस शोधली व मानवजातीला साथीच्या रोगांपासून वाचण्याचे एक प्रभावी शस्त्र दिले. 1950 पर्यंत जगभरातले 60% मृत्यु हे देवीच्या रोगाने होत असत. दैवी प्रकोप समजल्या जाणाऱ्या ह्या आजारावर मात करण्यासाठी शीतला देवीची पूजा केली जात असे, पण विज्ञानाने अंधश्रद्धेवर मात करून ह्या शीतलादेवीच्या प्रकोपाला कायमसाठी शांत केले. आजही धुळे, गुडगाव येथे शितलामाता मंदिर आहे जिचे अस्तित्व नाकारुन मानवी सभ्यता विज्ञानाच्या विकासाच्या प्रक्रियेत पुढे चालत राहिली. डॉ. एडवर्ड जेन्नर ह्यांनी बघितले की देवी झालेल्या गायींचे दूध काढणाऱ्या गवळणींना हा आजार होत नाही व शोध लागला की एखादया आजाराचे विषाणू निष्प्रभ करून मानवी शरीरात टोचल्यास शरीर त्या आजाराविरोधात रोगप्रतिकारशक्ती तयार करते. 1798 मध्ये देवीची लस आली, संपूर्ण जगाला देवीमुक्त होण्यास 180 वर्षे लागलीत. लस निर्मितीची प्रक्रिया पूर्ण होण्यास सामान्यतः 8-10 वर्षांचा कालावधी लागतो. सर्व प्रथम परीक्षण प्राण्यांवर केले जाते, त्यात प्रभावी ठरल्यास माणसांमध्ये क्लिनिकल चाचणी केले जाते. ही चाचणी 3 टप्प्यांमध्ये केली जाते ज्यात प्रत्येक टप्पा अनेक वर्षांत पूर्ण होतो. पहिल्या टप्प्यात 10-50 लोकांवर परीक्षण केले जाते व लसीची सुरक्षितता तपासली जाते, त्यात यशस्वी झाल्यास दुसऱ्या टप्प्यात शेकडो लोकांवर चाचणी करून हे बघण्यात येते की लसीचा किती खुराक गरजेचा आहे, त्याचे दुष्परिणाम काय आहेत व त्या नंतर सर्वात महत्वाचा असणाऱ्या तिसऱ्या टप्प्यात वेगवेगळ्या प्रदेशांत राहणाऱ्या हजारो लोकांवर चाचणी केली जाते, ज्यात लस किती प्रभावी आहे याचे परीक्षण केले जाते.

**भांडवली प्रतिस्पर्धेतील कोरोना लसीचे वास्तव : नफा केंद्रस्थानी, सामान्य जनतेला बनवले 'गिनी पिग'.**

भांडवली व्यवस्थेत लस किंवा औषधं ही मुख्यतः माणसांच्या गरजेसाठी नसून नफ्यासाठी बनवली जातात. एखाद्या रोगावर औषधाचे किंवा लसीचे संशोधन करायचे की नाही हे त्या त्या देशावर आपली सत्ता गाजवणाऱ्या मोठ्या उद्योगधंद्यांना काय हवंय, त्यांची काय गरज आहे यावरून ठरत असते. बोस्टन स्थित 'मॉडर्ना' ह्या कंपनीची कोरोना लस बाजारात येण्याची चिन्ह दिसू लागताच क्षणातच कंपनीच्या शेअर्स ची किंमत तब्बल 20 डॉलर्स ने वाढली. कंपनीने दिलेली माहिती अपुरी आहे की पूर्ण, लस खरोखर माणसांना टोचली जाण्यास सुरक्षित आहे की नाही, अभ्यास आणि परिक्षणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे किंवा नाही ह्या सर्व बाबींशी कुणालाही घेणे-देणे नव्हते. कोरोनाचे वैश्विक संकट फार्मा कंपनींसाठी जणू एक मेजवानीच होती. घाबरलेल्या, आजारी जनतेकडून लाखोंनी पैसा उकळला गेला, आणि आजही उकळला जातोय! माध्यमांवर सतत कोरोनाच्या लसीच्या शोधाच्या 'चमत्काराच्या' कथा जणू 'सगळं काही उत्तम आहे' ह्या आविर्भावात दाखवून लोकांचे कामावर परत जाण्यासाठी मनोबल वाढवले गेले, कारण कारखान्याच्या मालकांची, उद्योगपतींची ती गरज होती. भांडवली व्यवस्थेत जनतेच्या जीवनाची किंमत भांडवलदारांच्या नफ्यापुढे शून्य असते. यापूर्वीही अपुऱ्या संशोधनाच्या बळावर बाजारात आलेल्या लसी किंवा औषधांचे भयंकर परिणाम जनतेला भोगावे लागले आहेत. 2015 मध्ये एका फ्रेंच औषध कंपनीकडून बाजारात आलेल्या डेंग्यू लसीमुळे लस टोचण्यात आलेल्या लोकांमध्ये आजार गंभीर स्वरूप धारण करू शकतो असे लक्षात आले पण तोपर्यंत 8,00,000 शाळकरी मुलांना लस टोचली गेली होती! 1957 मध्ये जर्मन कंपनीमार्फत बाजारात आलेल्या 'थॅलिडोमाईड' ह्या औषधाला निद्रानाश, चिंता, काही आजारांत सकाळी होणारी मळमळ, उलट्या ह्या आजारांवर सर्वोत्तम औषध म्हणून प्रसिद्ध केले गेले परंतु 1961 मध्ये लक्षात आले की ह्या औषधामुळे गंभीर असे जन्मापासून होणारे अपंगत्व होत असल्याचे लक्षात आले. 1940-1970 च्या काळात गरोदर स्त्रियांना गर्भपात होऊ नये म्हणून देण्यात येणाऱ्या डायइथिलस्टिलबेस्ट्रोल (इस्ट्रोजन पिल) घेतलेल्या स्त्रियांच्या मुलींमध्ये एक दुर्मिळ प्रकारातला योनीचा कर्करोग होत असल्याचे लक्षात आले. थोडक्यात काय तर लसीचा किंवा औषधांचा प्रभावीपणा आणि सुरक्षिततेची किमान हमी काळजीपूर्वक, नियंत्रित परीक्षण आणि चाचणी केल्याशिवाय दिली जाऊ शकत नाहीत. अमेरिके पासून भारतापर्यंत कोरोनालशीची आश्वासनं निवडणुकीच्या प्रचारांत अश्या प्रकारे देण्यात आले जणू गुन्हाळात बनणाऱ्या गुळाबद्दल आश्वासन दिले जावे.

3 ऑगस्ट, 2020 च्या बातमीनुसार विश्व आरोग्य संस्थेकडे (WHO) 165 कोरोना लस बनवणाऱ्या कंपनीची यादी होती ज्यापैकी 23 कंपन्या ह्या माणसांवर केल्या जाणाऱ्या चाचणीच्या टप्प्यात पोहचल्या होत्या. प्रश्न हा आहे की इतक्या लसी का? अमुक एक लस अधिक प्रभावी, तमुक एक लस अधिक स्वस्त, वगैरे विभाजन कशासाठी? एकच सुरक्षित, प्रभावी लस सर्वांना उपलब्ध व्हायला हवी. पण मग भांडवली व्यवस्थेच्या प्रतिस्पर्धेच्या तत्वाच्या विरोधात जाणारी ही बाब आहे. रोज घ्यावी लागणारी औषधं मुख्यतः फार्मा कंपनींसाठी नफा कमावण्याची प्रमुख साधनं असतात. परंतु कोरोना लसीच्या बाबतीत अनेक मोठ्या उद्योगांनी, आरोग्य संस्थांनी, सरकारांनी संशोधनात आपला पैसा ओतला. परिणामतः इजिप्त, थायलँड, नायजेरिया, अर्जेंटिना यांसारखे लसींच्या संशोधनासाठी न ओळखले जाणारे देश सुद्धा कोरोनालस शर्यतीत धावतांना दिसले. साम्राज्यवादी अमेरिकेने विविध फार्मा कंपन्यांकडून करोडो लसी आधीच आरक्षित करून ठेवल्यात, म्हणजे निश्चित आहे की विकसनशील, गरीब देशांना लस सर्वात शेवटी मिळणार किंवा मिळणार देखील नाही. लवकरात लवकर लस बाजारात आणता यावी म्हणून त्वरित मार्ग शोधण्यात आलेत. जसे की जर्मन आणि अमेरिकन कंपनी फायझर आणि मॉडर्ना यांची आरएनए (RNA Based) लस. रोगाविरुद्ध रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी विषाणूचे आनुवंशिक घटक (DNA/RNA) हे माणसाच्या शरीरात टोचले जातात. परंतु आजतागायत ह्या पद्धतीने विकसित करण्यात आलेली लस यशस्वी झालेली नाही. चीन ने जानेवारी महिन्यात कोरोना व्हायरसचा जेनेटिक कोड शोधल्यानंतर शेकडो कंपन्या लसींच्या शोधाच्या स्पर्धेत उतरल्या. भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था, पुणे येथील डॉ. विनीता बाळ यांच्यामते अनेक वर्षांपासून क्षयरोग (टी. बी.), मलेरिया यांसारख्या गरीब देशांतील गरीब वस्त्यांमध्ये पसरलेल्या, हजारो लोकांचा बळी घेणाऱ्या आजारांच्या लसीसाठी इतका कमालीचा उत्साह कधीच फार्मा कंपन्यांकडून दिसला नाही. नक्कीच या लशीच्या निमित्ताने या शेकडो कंपन्यांसाठी बाजारात स्वतःच अढळ स्थान निर्माण करण्याची, भांडवल संचय करण्याची एक मोठी संधी निर्माण झाली आहे.

कोरोना आजाराची सुरुवात झाली तेव्हा जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले होते की लस येण्यास 18 महिने तरी लागतील. पण लस मात्र एका वर्षाच्या आतच बाजारात आली आहे. भारतात सिरम संस्था, पुणे च्या कोवक्सिन आणि भारत बायोटेक च्या कोव्हीशिल्ड ह्या लसीना आपत्कालीन स्थितीत वापरण्यास परवानगी देण्यात आली, म्हणजेच क्लिनिकल ट्रायल्स पूर्ण न करता देखील त्यांचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली. भारतात लसीकरण मोहिमेच्या अंतर्गत 3 लाख लोकांना लस टोचल्यानंतर कोव्हॅक्सिन बनवणाऱ्या फर्म ने जाहीर केले की पूर्वीचा काही जुना, दीर्घकाळ असणारा आजार असल्यास लस टोचून घेऊ नये, हे म्हणजे जनतेला 'गिनी पिग' बनवणेच झाले. अघोषितपणे देशातील जनतेवर प्रयोग सुरू करण्यात आला. मोहिमेदरम्यान नेत्यांपैकी कुणीही लस टोचून घ्यायला पुढे आले नाही. हिंदुस्थान टाइम्स च्या एका बातमीनुसार मोहिमेच्या पहिल्या 3 दिवसांत 4,29,409 लोकांना लस टोचण्यात आली, त्यापैकी 580 लोकांमध्ये प्रतिकूल परिणाम दिसून आलेत. ज्यांच्यासाठी थाळी, टाळी, फुलांचा वर्षाव करण्यात आला त्याच स्वास्थकर्मींवर सर्वप्रथम प्रयोग करण्यात आला. उत्तरप्रदेशात बेलारी येथे 43 वर्षांच्या महिपाल सिंग नावाच्या वॉर्ड बॉयचा लस टोचल्याच्या दुसऱ्या दिवशी हृदयविकाराने मृत्यू झाला. कोलकाता येथील 35 वर्षीय परिचरिकेला लस टोचल्यानंतर तात्काळ दवाखान्यात भरती करावे लागले. एम्स दिल्ली, येथील 22 वर्षीय वॉर्ड बॉयला देखील लस टोचल्यानंतर श्वसनाचा त्रास होऊ लागल्याने भरती करावे लागले. दिल्लीत लसीकरणाच्या पहिल्या दिवशीच 51 लोकांमध्ये उलट्या, सूज येणे, पुरळ उमटणे, ताप येणे, भोवळ येणे यांसारखे परिणाम दिसून आलेत. इंडिया टुडे च्या एका वृत्तानुसार 23 जानेवारी पर्यंत तेलंगणा, उत्तर प्रदेश, कर्नाटक, राजस्थान, गुरुग्राम, ओडिसा, आंध्र प्रदेश ह्या राज्यांमध्ये लस टोचल्याच्या नंतर किमान 9 आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. गुरुग्राम येथील पीएचसी भंगरोला येथे काम करणाऱ्या राजवंती नामक 56 वर्षीय परिचारिका ज्यांनी कोरोनाच्या काळात कर्तव्य म्हणून एक दिवसही सुट्टी न घेता रुग्णांची शुश्रषा केली, त्यांचा देखील लस टोचल्यानंतर अल्प काळात मृत्यू झाला. 12 डिसेंबर रोजी लसीकरणाच्या तिसऱ्या टप्प्यात लस टोचून घेतलेल्या आरोग्य कर्मचारी दीपक मारावीचे निधन झाले. ह्या घटनांमुळे लसीच्या सुरक्षिततेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. अनेक आरोग्य कर्मचाऱ्यांनी लस घेण्यास नकार दर्शविला. जागतिक स्तरावर देखील देशातील जनतेला गिनी पिग बनवल्याची उदाहरणे आहेत. इस्राईल मध्ये 60 वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या लसीकरण झालेल्या लोकांपैकी 13 जणांना फेशिअल पाल्स झाल्याचे दिसून आले. नॉर्वेत फायझरची लस घेतलेल्या 23 ज्येष्ठ नागरिकांचा मृत्यू झाला.

**कोरोना लसीमागचे गलिच्छ राजकारण**

भारतात कोरोनाची दुसरी लाट आल्यानंतर असंख्य बेरोजगार, एका वेळेच्या जेवणालाही मोताद झालेली जनता, सुरक्षा उपकरणाअभावी जीव गमावणारे आरोग्य कर्मचारी ह्या सर्वांकडे कानाडोळा करून निर्लज्ज पणे हातावर हात धरून बसून राहिलेल्या मोदी सरकारने आपल्या भांडवलदार मित्रांना कर्ज माफी देणे, सरकारी क्षेत्रांना खाजगी कंपन्यांना विकणे, कामगार विरोधी श्रम कायदे लागू करणे, स्वतःच्या फॅसिस्ट अजेंड्याविरुद्ध लढणाऱ्या जनपक्षधरांना तुरुंगात डांबण्याचे काम चोखपणे पार पाडले आणि कोरोन लसीच्या नावाने मात्र कोरोना विरुद्धची मोठी लढाई जिंकल्याच्या फुशारक्या मिरवत आपले गलिच्छ राजकारण चालूच ठेवले.

कोरोना लसींच्या शर्यतीची सुरवात होताच वैज्ञानिकांच्या श्रेयाचा तुरा स्वतःच्या माथी मिरवत बिहार निवडणुकीच्या काळात लसीचा थांगपत्ता नसतांना आश्वासनं द्यायला मोदी सरकार सज्जच होते. संपूर्ण देशातील जनतेची

पान 7 वर

# लोकशाही-नागरी अधिकारांच्या रक्षणासाठी लढा उभा करा!

पान 1 वरून

कोर्टाच्या परवानगी शिवाय कोणालाही अटक करण्याची शक्ती बहाल करण्यात आली आहे. ह्यानंतर कोणावरही फौजदारी आरोप ठेवण्यासाठी प्रत्येक संभाषण, संवाद, प्रकाशन ह्यांचे मूल्यमापन करणे हे पोलीस व राज्याच्या व्यक्तीनिष्ठ व्याख्येवर अवलंबून असणार आहे. जनतेच्या लोकशाही अधिकारांना संकुचित करून भांडवली राज्यसंस्थेचे दमनतंत्र मजबूत करू बघणारे हे अजब 'कम्युनिस्ट' आहेत. माकप-भाकप सारखे दुरूस्तीवादी पक्ष नवउदारवादी धोरणाला पुढे घेऊन जाण्यात व भांडवली उदार पार्ट्यांना ह्यात साथ द्यायला सतत पुढे राहिलेले आहेत. सोबतच नवउदारवादी धोरणांमुळे विस्फोटक स्थिती निर्माण होऊ नये व वर्गसहयोग टिकावा म्हणून अर्थवादी लढाया लढणे, भत्तेवाढ, वेतनवाढ व काही लोककल्याणकारी योजना लागू करणे हे करत असतात. परंतु लोकशाही-नागरी व राजकीय अधिकारांच्या दमनात तेही मागे नाहीत.

राज्यसत्तेचे वर्ग चरित्र समजणारा कोणीही हे सहज समजू शकतो की भांडवली राज्यव्यवस्था ह्या अमर्याद शक्तींचा वापर कशासाठी व कोणाविरोधात करत आली आहे, करते आहे व ह्यांनतरही करेल. काही उदाहरणांच्या प्रकाशात ह्याला अजून नीट समजून घेऊयात. मारूतीच्या आंदोलनात मॅनेजमेंटच्या गुंडांनी कामगारांवर हल्ला केला पण खोट्या आरोपांखाली न्यायालयीन ट्रायल अभावी अनेक वर्षांपासून कामगार जेल मध्ये सडत आहेत; शाहीनबाग आंदोलनात शांततेच्या मार्गाने एन.आर.सी, सी.ए.ए चा विरोध करणाऱ्यांवर देशद्रोहाचे आरोप लावले गेले तर अनुराग ठाकूर, परवेश शर्मा, योगी आदित्यनाथ, अमित शहा सारखी मंडळी त्याच वेळेला भडकावू भाषण देऊनही निर्दोष फिरत आहेत; भिमाकोरेगाव प्रकरणी दंगलीचे सूत्रधार भिडे व एकबोटे मुक्त आहेत तर अनेक कार्यकर्ते-बुद्धीजीवी यु.ए.पी.ए सारखी कठोर कलमं लावून जेल मध्ये सडवले जात आहेत; काफील खान , प्रशांत कनोजिया पासून मंदीप पुनिया सारख्या पत्रकारांवर राजद्रोहासारखे खटले भरले जातात आणि अर्णव गोस्वामी, सुधीर चौधरी, रोहित सरदाना इत्यादी गोदी मीडियाचे दरबारी पत्रकार दररोज विष पेरण्यासाठी मुक्त असतात; जे.एन.यु, ए.एम.यु सारख्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर खोटे खटले भरले जातात आणि अभाविप सारख्या फॅसिस्ट विद्यार्थी संघटनेला भाजपची सत्ता असेल तेथे मोकळे रान दिले जाते, विद्यापीठात हल्ले करूनही शिक्षा होत नाहीत; सी.पी.एम. ची सत्ता असेल तर एस.एफ.आय. विद्यार्थी संघटनेला इतर विद्यार्थी संघटनांचा लोकशाही अधिकार धाब्यावर बसवायचा परवानाच मिळतो; भाजपचे समर्थक बलात्कारी नेत्यांच्या मिरवणूका काढतात आणि दुसरीकडे हाथरस सारख्या बलात्काराच्या घटनांच्या बातम्या देणाऱ्या पत्रकारांवरही खटले दाखल होतात, अशी असंख्य उदाहरणे देता येतील.

देशाची भांडवली राज्यघटना जनतेला मर्यादित का होईना परंतु काही लोकशाही नागरी अधिकार कागदावर देते. पण कामगार-कष्टकऱ्यांच्या वर्ग स्थितीमुळे ह्या कागदी अधिकारांचे सर्वात जास्त हननही त्यांनाच भोगावे लागते तसेच संविधानिक उपचारा पर्यंत त्यांची पोहोचही नसते. मुळात न्याय-व्यवस्थेचेही मूळ स्वरूप अजुनही तसेच आहे जसे इंग्रजांच्या काळात होते. राज्य घटना आणि न्यायव्यवस्थे कडून मिळालेले थोडे थोडके अधिकारही भ्रष्ट व कुचकामी नोकरशाही तंत्रामुळे कामगार-कष्टकऱ्यांना मिळू शकत नाहीत. केरळमधले दुरूस्तीवादी अशा जुजबी संविधानिक अधिकारांना सुद्धा संपवायला निघाले होते. देशभरामध्ये इतरही पक्षांची सरकारे आज अशा प्रकारे दमनकारी कायदे बनवणे आणि लागू करण्यात मागे नाहीत.

फॅसिस्ट भाजप दमनतंत्रा मध्ये सर्वात पुढे आहे यात आश्चर्य नक्कीच नाही. नुकतेच केंद्रीय गृह मंत्रालयाने दोन दिवसाआधीच समाजातील "राष्ट्र विरोधक" शोधण्यासाठी सायबर स्वयंसेवक नेमण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या प्रस्तावानुसार सायबर स्वयंसेवक होऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही नागरिकाला हे काम करता येईल. ह्यातून अत्यंत गंभीर अशा दोन गोष्टी समोर येतात. एक तर जनतेच्याच एका हिश्श्याला व्यापक जनतेच्या विरोधात वापरून घेणे. दुसरं फॅसिस्ट सत्ता सरकार प्रेमाला देशप्रेमाचे पर्यायवाची बनवते व सरकारचा विरोध हा राष्ट्र विरोध म्हणून जनतेच्या मनात ठसवला जातो. त्यामुळे फॅसिस्ट सत्तेला, शोषण-दमनाला राजकीय विरोध करणारी प्रत्येक शक्ती राष्ट्रद्रोही ठरवली जाते. थोडक्यात आता अशा प्रकारच्या उत्तरदायित्व-हीन झुंडींच्या माध्यमातून प्रत्येक प्रकारच्या जनपक्षधर आवाजाला राष्ट्रविरोधी ठरवण्याचा सरकारी परवानाच रा.स्व.संघाच्या समर्थकांना दिला जाईल आणि फॅसिस्ट शक्तींचा नंगा नाच अजून भडकपणे चालू होईल.

राजद्रोहासारख्या कोणताही कायदा लोकशाही मध्ये असू शकत नाही. ब्रिटीश सत्तेने या कायद्यांचा वापर सतत क्रांतिकारकांच्या दमनासाठीच केला. स्वातंत्र्यानंतर भांडवलदार वर्गाच्या प्रामाणिक प्रतिनिधीचे काम करणाऱ्या काँग्रेस सरकारने या कायद्यांना जपलेच नाही, तर वेळोवेळी विरोधकांच्या दमनासाठी त्यांचा वापरही केला. लोकशाही आणि उदारवादाचा बुरखा घालणाऱ्या काँग्रेसनेच टाडा, रासुका सारखे कायदे बनवले आणि लागू केले. आता फॅसिस्ट भाजप राजवटीत या कायद्यांचा वापर हात ढिला सोडून केला जात आहे. 2010 ते 2020 या काळात तब्बल 10,938 इतके राजद्रोहाचे खटले दाखल केले गेले. यामध्ये मोदी सत्तेत आल्यानंतर, 2014 नंतर, प्रतिवर्षी 28 टक्के इतक्या वेगाने वाढ झालेली असली तरी काँग्रेसच्या (युपीए-2) राजवटीतही शेकडो गुन्हे दाखल केले गेले होते हे विसरता कामा नये. प्रधानमंत्री वा मुख्यमंत्र्यांबद्दल अनुद्गार (!) काढल्यासारख्या घटनांवरूनही हे गुन्हे दाखल झाले आहेत. विरोधक राजकीय नेते, पत्रकार, बुद्धीजीवी, लेखक आणि विद्यार्थ्यांवर अशा प्रकारच्या खटल्यांचे मोठे प्रमाण हेच दर्शवते की राज्यसत्तेला आता लोकशाहीचा दिखावी बुरखा सुद्धा नकोसा होत आहे.

या सर्व प्रकारच्या दमना विरोधात आज कामगार-कष्टकऱ्यांनी आवाज उठवणे, लोकशाही-नागरी अधिकारांच्या रक्षणार्थ उभे राहणे आपले कर्तव्य आहे. शेतकरी आंदोलनाच्या मागण्या जरी श्रीमंत मालक शेतकऱ्यांच्या वर्गहिताच्या असतील तरी शेतकऱ्यांना राजकीय विरोधाचा, आंदोलनाचा लोकशाही अधिकार आहे. ह्या अधिकाराचे हनन किंवा कुठल्याही पद्धतीने दमन (फॅसिस्ट, धर्मांध, जातीयवादी शक्तींचे दमन सोडून) होत असेल—जे आता होत सुद्धा आहे—तर त्याचा विरोध करणे हे कामगार वर्गाचे कर्तव्य आहे. आंदोलनाच्या संदर्भात मोदी देशाच्या संसदेत म्हणाले की संघर्षात एक "आंदोलनजीवी" जमात आहे तिच्या पासून सुरक्षित राहायला हवे. मोदी आंदोलनापासून "सुरक्षित" राहायला कोणाला शिकवत आहेत? खरे तर मजुरी गुलामीच्या शोषणकारी व्यवस्थेत आंदोलनाचा अधिकार कामगार-कष्टकरी जनतेसाठी सन्मानाने जगण्याची पूर्वशर्त आहे. भांडवली संकटाच्या काळात व्यवस्थेचे संकट विस्फोटक स्थितींकडे जाऊ नये म्हणून सत्ताधारी वर्ग आज आंदोलनाच्या मूलभूत अधिकारालाही हिरावू बघतो आहे कारण ह्याच दैन्य, दारिद्र्य, कुपोषण, असमानता, अन्यायाच्या ज्वालामुखीच्या तोंडावर अय्याशी करणाऱ्या भांडवलदार, मालक व उच्च मध्यमवर्गाला ह्या धगधगत्या लाव्हाच्या विस्फोटाची शंका व भिती नेहमीच असते व ह्या व्यवस्थेच्या अंतापर्यंत ती असणारही आहे. निती आयोगाचे प्रमुख अमिताभ कांत यांनी शेतकरी आंदोलना संदर्भात नुकतेच म्हटले की देशामध्ये लोकशाही जरा जास्तच आहे. यावरूनही दिसून येते की भांडवलदार वर्गाच्या एका मुख्य हिश्श्याला आता जनतेचे लोकशाही-नागरी अधिकार नकोसे झाले आहेत.

हे सर्व हल्ले वाढण्याचे मूलभूत कारण हे आहे की आज भांडवली संकटाच्या काळात, नफ्याचा दर घसरलेला असताना, मंदीचे संकट तीव्र झालेले असताना, बेरोजगारीचा दर उच्चांक गाठत असताना, महागाईने शिखर गाठलेले असताना, समाजातील वस्तुगत स्थिती विस्फोटक बनत असतांना भांडवली राज्यसत्तेची दमन यंत्रणा चुस्त-दुरुस्त करण्याचे काम सत्ताधारी वर्गाने द्रुतगतीने चालू ठेवलेले आहे. अशा परिस्थितीत या व्यवस्थेतील सर्वात शोषित वर्ग व त्यामूळेच व्यवस्थाविरोधी संघर्षाची सर्वात जास्त गरज असणारा वर्ग म्हणून, लोकशाही-नागरी अधिकारांवर होणाऱ्या प्रत्येक हल्ल्यांविरोधात कामगार व कष्टकरी वर्गाने अत्यंत निग्रहाने संघर्ष केला पाहिजे. लोकशाही-नागरी अधिकारासाठी सामान्य कामगार-कष्टकऱ्यांचे व्यापक जनआंदोलन उभे करण्याची गरज आहे. पण असे आंदोलन फक्त राज्य यंत्रणेच्या निरंकुशतेविरोधात असून भागणार नाही. भारतीय समाज हा उत्तरवसाहतवादी देश आहे जिथे भांडवलशाही पुनर्जागरण-प्रबोधन-क्रांती ह्या प्रक्रियेत आलेली नाही; त्यामुळे सामाजिक-सांस्कृतिक मूल्य-मान्यता-संस्थांमध्ये लोकशाही जाणीवांचा अत्यंत अभाव आहे. देशात फक्त राज्य आणि नागरिक ह्यामधीलच नव्हे तर नागरिक-नागरिक संबंधांमध्ये सुद्धा दमन, असमानता आणि अपमानजनक दुभंगलेपण आहे. त्यामुळे राज्यसत्तेसोबतचा लोकशाही नागरी अधिकाराच्या संघर्षाचा भाग म्हणून जातीवाद, पितृसत्ता, धार्मिक अंधश्रद्धा व पूर्वग्रहाच्या विरोधात व्यापक व झुंजार सामाजिक सांस्कृतिक मोहीम सुरू करण्याची गरज आहे. तरच राज्यव्यवस्थेच्या निरंकुशतेला सुद्धा जास्त परिणामकारक रित्या टक्कर देणे शक्य होईल.

## तुमच्या सदाचाराचा ऱ्हास

पान 11 वरून

झालेले नाहीत. त्यांची ईश्वरभक्ती अनन्य अशी होती. सकाळी ईश्वरावर एखादी ओळ बनविल्याशिवाय ते बाजेच्या खाली उतरत नव्हते आणि तासनतास पूजाविधी करायचे. परंतु दुसरीकडे त्यांची स्थिती अशी होती की आपल्या शहर आणि राज्यामध्ये एखादी सुंदर स्त्री असल्याचे त्यांना जसे समजले की ते तिला मिळवल्याशिवाय शांत होत नसत.

एक तरुण विधवा राणी होती. तिच्याकडे गडगंज संपत्ती होती. एका महान तिर्थावर ईश्वर भक्तीमध्ये तल्लीन होत ती आपला दिवस घालवायची. धार्मिक उत्सव, पूजापाठ यावर मुक्तहस्ते धन खर्च करत होतीच, त्यासोबतच तिच्याकडे अनेक विद्यार्थ्यांना बोलावून जेवू घातले जायचे. राणीसाहेब आपल्या नजरेनेच हेरून विद्यार्थ्याला सामील करून घ्यायची आणि तरुण विद्यार्थी रात्र-रात्र पार्थिव पूजेमध्ये तिची साथ द्यायचे. अतिशय वयोवृद्ध होऊनही तिच्या अपार काम-पिपासेमध्ये काहीच फरक पडला नव्हता.

एका अतिशय वजनदार हिंदू धर्माचे नेते आणि विष्णूचा साक्षात अवतार म्हणविल्या जाणाऱ्या महात्म्याबद्दलची गोष्ट आहे. त्यांनी हिंदू धर्माचा प्रचार आणि रक्षणासाठी अतिशय मोठे आयोजन केले होते. ज्यामध्ये भारतातील मोठ-मोठे राजे, शेठ-सावकार सामील होते. धार्मिक जगावर त्यांचा जेवढा दबदबा राहिला तेवढा कदाचित कोणाचाच नसावा. परंतु त्यांच्या खाजगी जीवनातील लिला पाहिल्या तर असे लक्षात येते की जणू काही साक्षात कृष्णच रासलीला करण्यासाठी अवतरीत झाले आहेत. सुंदर विधवांकडे तर त्यांचा विशेष ओढा असायचा.

आणखी एक असे महाराज होऊन गेलेत ज्यांच्या शास्त्रीय विद्वत्ता, धर्म-परायणता, दान आणि सदाचाराची छाप संपूर्ण भारतावर राहिलेली आहे. परंतु वरवर उपासना आणि कुमारी-पूजा इत्यादी धार्मिक अनुष्ठानांच्या नावाखाली ते आपल्या सर्व वासनांची पूर्ती करून घेण्यासाठी मोकळे होते आणि अशा धार्मिक पुरुषापासून कुटूंब असलेले चार हात लांब राहणेच पसंत करायचे.

अनुवाद: प्रवीण सोनवणे

*(पुढील अंकामध्ये याच लेखाचा राहिलेला भाग: मद्यपान, असत्य, चोरी-लाच, तुमच्या न्यायाचा ऱ्हास)*



# कोरोना लशीच्या नावाने जनतेच्या फसवणुकीचे राजकारण

पान 5 वरून

जबाबदारी सरकारची आहे हे विसरून बिहार निवडणूक जिंकण्यासाठी सार्वजनिक मंचावरून कोरोना लस सर्वप्रथम बिहारमधील जनतेला उपलब्ध करून देण्याचे दावे केले गेले. निवडणूक जिंकण्याच्या लालसेपोटी करोडो जनतेच्या आयुष्याशी निगडित मुद्याला केवळ एक निवडणुकीचा डावपेच म्हणून वापरलं गेलं. लसनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांमध्ये जाऊन, तिथल्या वैज्ञानिकांसोबत छायाचित्रीकरण करून मोदी जणू दाखवत होते की त्यांच्या अनमोल मार्गदर्शनाशिवाय लसनिर्मिती शक्यच होऊ शकत नाही. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद ( आयसीएमआर ) करवी मोदी सरकारने लसनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर 15 ऑगस्ट पर्यंत लस तयार व्हायला हवी म्हणून दबाव बनवला जेणेकरून मोदी लाल किल्ल्यावरून लसीची घोषणा करून स्वतःचा उदो उदो करवून घेऊ शकतील. ज्यावेळी भारत बायोटेक आणि सिरम संस्थेच्या लसींना लसनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण न करता परवानगी देण्यात आली तेव्हा ड्रग कन्ट्रोलर जनरल ऑफ इंडिया ने प्रश्न उपस्थित केला. परंतु लाखो देशवासीयांच्या जीवनापेक्षा स्वतःचे राजकीय स्वार्थच महत्वाचे असणाऱ्या मोदी सरकारने याकडे सपेशल दुर्लक्ष केले. 16 जानेवारीला जेव्हा प्रधानसेवकांनी लसीकरण मोहिमेची घोषणा केली तेव्हा दोन्ही लस पूर्णतः तयार असल्याचे सांगितले.

कोरोना लसीसाठी सरकारने दिलेल्या अनुदानाबद्दलही प्रचंड गुप्तता मोदी सरकार बाळगत आहे. नवनीत चतुर्वेदी नावाच्या एका पत्रकाराने आर.टी.आय अंतर्गत भारतातील कोरोना लस मोहिमेच्या खर्चाबद्दल विचारले असता 'ही माहिती देणं देशहिताच्या विरोधात आहे' सांगून टाळण्यात आलं. खर्च भारत सरकार करत नाहीये, पी एम केअर्स मधून केला जात नाहीये तर खर्च करतंय कोण? खर्च उचलणारा कुठलाही गैरसरकारी घटक स्वतःच्या फायद्याशिवाय खर्च उचलणार नाही. खरेतर विविध सरकारांनी दिलेली खरेदीची हमी, संशोधनाकरिता दिलेले पाठबळ हे जनतेच्याच पैशांच्या जीवावर आहे. तेव्हा तयार झालेल्या लसींवर जनतेचा अधिकार असला पाहिजे, ना की लस कंपन्यांचा. विश्व आरोग्य संस्थेचे संचालक टेड्रोस आधानोम ह्यांनी नाईलाजाने का होईना सांगितल्या नुसार जग कोरोनाच्या वैश्विक संकटापासून तोपर्यंत मुक्त नाही होऊ शकत जोपर्यंत जगातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत आरोग्यसुविधेचा, लस आणि औषधांचा समान, निःशुल्क अधिकार पोहचत नाही. पण आरोग्य व्यवस्थेचे बाजारीकरण केलेल्या भांड्वली पद्धतीत असे होणे कल्पनेपलीकडे आहे.

**कोरोनाने घेतलेले बळी हे बाजाराच्या व्यवस्थेचे अपयश आहे**

नफेखोर, मूठभर श्रीमंतांची चाकरी करणारी व कामगार कष्टकऱ्यांच्या श्रमाचे शोषण करणारी भांडवली व्यवस्था जगभरात कोरोनाशी लढण्यात असमर्थ ठरली. खरेतर आरोग्य व्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण करून त्यावरील खाजगी कंपन्यांचा ताबा नष्ट करणे, सर्वांसाठी निःशुल्क, दर्जेदार आरोग्यव्यवस्था लागू करणे, हाच कोविड-19 सारख्याच्या वैश्विक संकटापासून वाचण्याचा एकमेव मार्ग असू शकतो. पण इतक्या कठीण काळातही भांडवली व्यवस्थेची चाकरी करणारी सरकारं आरोग्य व्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण करू शकत नव्हते कारण केवळ नफा आणि पैसाच केंद्रस्थानी असलेल्या, भांडवलदार वर्गाच्या हाती सर्व उत्पादनाची साधनं एकत्र करणाऱ्या ह्या व्यवस्थेचे सूत्र बिघडले असते. म्हणूनच कोरोनाने जगभरात घेतलेले 21 लाखांच्या वरील बळी हे व्हायरसचे कमी आणि नफ्याच्या व्यवस्थेचे परिणाम जास्त आहेत.




कार्टून साभार: मंजूळ

## कविता

बायांनो ! बोला!
कष्टाच्या दुहेरी बोजाने, थकून दमलेल्या
उदास-निराश सर्व बायांनो! बोला!
खुल्या कंठाने बोला !
तोंडावर बांधलेली पट्टी ओरबाडून
छातीवर ठेवलेल्या वजनी दगडाला
दूर ढकलत बोला!
वर्षानुवर्षे सहन केलेल्या
कोंडमारा, अंधार आणि
जुलमा बद्दल सांगा !
घराच्या दरवाजाच्या साखळी विरोधात,
चुलीच्या डोळे चुरचुरवणाऱ्या धुराच्या
विरोधात,
भाषेच्या कैदखान्याच्या आणि लादलेल्या
नैतिकता आणि मज्जावांच्या विरोधात
बोला!
अंधारात मागे कधीतरी
ठेचल्या, चुरडल्या गेला होतात त्याबद्दल
खुलेआम बोला!
तुमच्या कोंडमाऱ्या आणि भितीबद्दल
खुल्या मंचावरून बोला !
सोसलेल्या सक्ती, धोके आणि
बेईमानी बद्दल सांगा
आणि गाठी सोडून सृजन-पाखरू बना
पंख पसरून उडण्यासाठी !

बोलाल तर प्रत्येक अनाचार आणि
अत्याचारा विरुद्ध बोला !
भांडवलाच्या पाशविकते विरोधात आणि
खुनी
फॅसिस्ट पंजांविरोधात बोला
अर्ध्या आकाशाच्या आणि अर्ध्या धरतीच्या
हिश्श्यासाठी
न्याय आणि अधिकाराच्या लढाईतही
अर्धा हिस्सा तर द्यावाच लागेल !
म्हणूनच बोला !
भविष्यातल्या स्त्रियांसाठी
येणाऱ्या पिढयांसाठी बोला!
बोलून करायचीय तुम्हाला एक सुरूवात
मिळवायची आहे हरवलेली
मनुष्यता, सन्मान आणि आशा
मिळवायचे आहे
आपली स्वप्न आणि जीवनाचे ध्येय !
नाही! असे नाही कि बोलू लागताच
नवी पहाट उजाडणार आहे
पण विश्वास ठेवा , रात्र ढळण्याची
गती मात्र नक्कीच खूप वाढेल !

**✍ कविता कृष्णपल्लवी**
**अनुवाद: राहुल**

## सर्व शेतकऱ्यांचे हित आणि मागण्या एक आहेत का?

पान 10 वरून

मागण्या पूर्ण जरी झाल्या तरी त्यातून जास्तीत जास्त तात्कालिक दिलासा मिळू शकतो आणि जोपर्यंत ती असे करू शकते, त्या संघर्षामध्ये आम्ही कम्युनिस्ट विनाशर्त त्यांच्यासोबत आहोत, त्यांना संघटीत करण्यासाठी आणि नेतृत्व देण्यासाठी तयार आहोत.

पण सत्य हे आहे की भांडवली व्यवस्था असे पर्यंत गरीब आणि निम्न-मध्यम शेतकरी अनंत काळापर्यंत आपल्या छोट्या आकाराच्या शेतीला वाचवण्याची आशा ठेवू शकत नाहीत. सामुहिक आणि सहकारी शेती आणि समाजवादी राजकीय व्यवस्थेच्या अंतर्गतच ते एका वर्गाच्या रुपात आपल्या जमिनींना भांडवलदारांच्या हातात जाण्यापासून वाचवू शकतात. जसे की लेनिन ने आपल्या 'ग्रामीण गरिबांसाठी' या दिखामदार पुस्तिकेत लिहिले आहे. यासाठीच या तात्कालिक मागण्यांसाठी धनिक शेतकरी आणि कुलक तसेच कॉर्पोरेट भांडवली वर्ग दोघांशीही संघर्ष करताना आपल्याला आपले दूरगामी लक्ष्य, म्हणजे समाजवादाचे लक्ष्य कधीच विसरले नाही पाहिजे. फक्त एका समाजवादी व्यवस्थेमध्येच गरीब आणि निम्न-मध्यम शेतकरी आणि शेतमजुरांना उत्तम जीवन, आरोग्य, शिक्षण, सामाजिक आणि आर्थिक सुरक्षितता, आणि शाश्वती मिळू शकते. जर क्रांतिकारी कम्युनिस्ट वरील अल्पकालिक दिलासा देणाऱ्या मागण्यांवर गरीब शेतकरी आणि निम्न-मध्यम शेतकऱ्यांना संघटीत करत असताना हे सत्य सांगणार नाहीत, आणि समाजवादाच्या दूरगामी संघर्षासाठी संघटीत करणार नाहीत, तर ते त्यांना धोका देत असतील.

असो, या त्या मागण्या आहेत ज्या भांडवली व्यवस्थेच्या चौकटीमध्ये तात्कालिक रित्या व्यापक सीमांत, छोट्या आणि निम्न-मध्यम शेतकरी जनसमुदायाच्या विशिष्ट आणि सामान्य मागण्या आहेत. सध्या चालू असलेले धनिक शेतकऱ्यांचे आंदोलन या मागण्यांना उचलेल का? नाही ! कारण त्यांचे हित आणि मागण्या एकदम वेगळ्या आहेत. इथेही आपण बघू शकतो की सध्याच्या धनिक शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या मागणीपत्राचे (चार्टरचे) आणि त्यांच्या मागण्यांचे वर्गचरित्र काय आहे. हे स्पष्ट रुपाने धनिक शेतकरी-कुलकांचे आंदोलन आहे. आम्ही 'मजदूर बिगुल' च्या मागील अंकामध्ये विस्ताराने अगोदरच लिहिले आहे की गरीब शेतकरी आणि निम्न-मध्यम शेतकऱ्यांची एक मोठी संख्या सुद्धा कशाप्रकारे राजकीय चेतनेची कमतरता, विविध प्रकारच्या आर्थिक बंधनांमध्ये धनिक शेतकरी-कुलकांशी बांधलेले असल्यामुळे, कोणतेही स्वतंत्र मजबूत राजकीय संघटन नसल्यामुळे, कशाप्रकारे धनिक शेतकऱ्यांच्या या आंदोलनात भागिदारी करत आहे. पण यामुळे या धनिक शेतकरी आंदोलनाचे वर्ग चरित्र ठरत नाही. कोणत्याही आंदोलनाचे वर्ग चरित्र त्याची विचारधारा, राजकारण आणि मागण्यांचे वर्ग चरित्र यावरून ठरते.

(फेब्रुवारी 2021 मजदुर बिगुल मधून साभार)

अनुवाद: अभिजित

# मोदी सरकारच्या अय्याशी व भ्रष्टाचाराचे नवे शिखर: सेंट्रल विस्टा प्रकल्प

## कोट्यवधी बेघरांच्या देशात नवीन संसद उभारण्यास 20 हजार कोटी रुपये उधळण्याची योजना

✍अनुपम

कोरोना महामारीच्या काळात जेव्हा लोकांच्या मूलभूत गरजाही पूर्ण होऊ शकत नाहीयेत, आरोग्य सेवा कमकुवत आहेत, कोट्यवधी लोकांनी रोजगार गमावला आहे आणि मोठी लोकसंख्या दोन वेळच्या अन्नाला मोताद आहे, अशा स्थितीत स्वतःला देशाचा प्रधानसेवक म्हणवणाऱ्या प्रधानमंत्र्याने 20 हजार कोटींचा असा एक प्रकल्प आणला आहे ज्यातून जनतेला काहीही मिळणार नाही.

सेंट्रल विस्टा प्रकल्पाला चार वर्षांत म्हणजे 2024 पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे परंतू ह्या अंतर्गत नवीन संसद भवनाला दोन वर्षांच्या आत बनवले जाणार आहे. मोदी सरकारने 2022 ला 75 व्या स्वातंत्र्य दिवसाला ह्याच्या उद्घाटनाची विलक्षण घोषणा करत 10 डिसेंबर ला नव्या संसद भवनाचे भूमिपूजन करुन टाकले. घटनात्मक धर्मनिरपेक्षतेला उघडउघड फाट्यावर मारत ही करामत सुद्धा पूर्ण रूढी-परंपरेने, जनतेच्या पैशाला पाण्यासारखे वाहवून केली गेली. अपेक्षेप्रमाणेच सरकारच्या पाळीव सुप्रीम कोर्टाने सुद्धा बहाणेबाजी करत देशाच्या संसाधनांची भयंकर लूट आणि विनाश करणाऱ्या ह्या लाजिरवाण्या प्रकल्पाला हिरवा झेंडा दाखवला आहे. खरे तर ह्या प्रकरणाला आधी कोर्टात घेऊन जात त्यावर कोर्टाचा शिक्कामोर्तब करवून घेण्याचे हे नाटक ह्यासाठीच करण्यात आले होती की लोकांसमोर दवंडी पिटणे शक्य होईल की बघा सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा ह्याला योग्य ठरवले आहे.

विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे की ज्या देशात जवळपास 20 कोटी लोक फूटपाथ वर झोपतात आणि जवळपास तेवढेच लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात तेथे 971 कोटींचे संसद भवन बनवणे म्हणजे क्रूर चेष्टा नव्हे का? अशा लोकशाहीला आपण शोषकांचे राज्य म्हणू नये का, जेथे जनतेच्या रक्ता-घामाच्या कमाईतून शोषले गेलेले 20 हजार कोटी रुपये जनतेच्या छातीवर बसून मूग दळणाऱ्या नेते-मंत्री व नोकरशहांसाठी नवीन कार्यालय उभारण्यात उधळले जातील. परंतू ह्यावर कोणताच प्रश्न उभा राहू नये म्हणून दरबारी माध्यमांद्वारे अशी वातावरण निर्मिती सुरू करण्यात आलेली आहे की नवीन संसद बनणे किती आवश्यक आहे. संसद भवन उभे राहण्याच्या आधीच त्याच्या रंग-रुपाला वाखाणण्यासाठी एका पायावर उभ्या असणाऱ्या माध्यमांचा तोरा बघून अत्यंत आश्चर्य होते.

आधीच ह्या खर्चिक लोकशाहीच्या ओझ्याखाली देशातील गरीब जनता कण्हती आहे. करोडो बेघरांच्या ह्या देशात राष्ट्रपती 340 खोल्यांचा भव्य महालात—राष्ट्रपती भवनात—राहतात, जे जगातील सर्व राष्ट्राध्यक्षांच्या निवासांपेक्षा (व्हाईट हाऊस आणि बॅकिंघम पॅलेस पेक्षाही) मोठे आहे. 2007 ला राष्ट्रपती भवनाच्या देखभालीसाठी वार्षिक 100 कोटी रुपये खर्चाचा अंदाज होता जो आज जवळपास दुप्पट झालेला असेल. राष्ट्रपतींच्या स्टाफ, घरगुती खर्च आणि भत्त्यांवर जवळपास 75 कोटी रुपये वार्षिक खर्च होतो आहे. प्रधानमंत्री, मंत्रिमंडळ आणि संसदेवर दरवर्षी अब्जावधी रूपये खर्च होतात. महामारीच्या काळातही मोदी सरकारने 8000 कोटी रुपये राष्ट्रपती व प्रधानमंत्र्यासाठी दोन आलिशान विमाने घेण्यावर उधळले.

ह्या दानवाकार आणि अत्यंत खर्चिक नेतेशाही व नोकरशाही तंत्राचा 90 टक्क्यांपेक्षाही जास्त खर्च ती गरीब जनता पेलते आहे जिला मुलभूत गरजा सुद्धा भागवता येत नाहीत. सरकारी खजिन्याचा जवळपास 65 टक्के हिस्सा सामान्य जनता अप्रत्यक्ष करातून स्वरूपात देते. ह्यात 35 टक्क्यांपेक्षाही कमी भाग भांडवलदार व संपत्तीधारी वर्गाचा असतो.

आपल्या देशातील मंत्री-नोकरशहांचे थाट बड्या महाराज्यांनाही मात देणारे आहेत. लॉकडाऊनच्या काळातही खासदारांनी जेव्हा आपल्या खासदार निधीचा वापर लोकांपर्यंत धान्य वगैरे पोहोचवण्यासाठी करायला हवा होता, त्या काळातही ते अय्याशी-उधळपट्टी करत राहिले आणि जनतेच्या दुःख-त्रासाची खिल्ली उडवत राहिले. कोरोना संकटाच्या काळातही ह्या खर्चिक प्रकल्पांचे ओझे तीच जनता उचलेल जिच्या कडे ना रोजगाराची हमी आहे ना घराची व्यवस्था ना आरोग्य व शिक्षणाची कोणतीही हमी.

मोदीच्या राज्यात लोकांना द्वेष व असत्याच्या विषाची खुराक इतकी पाजली आहे की त्यांचा मोठा हिस्सा आता कुठल्याही प्रचाराला योग्य समजतो. जसे की दरबारी प्रसार माध्यमं सांगत आहेत की संसद भवन जुने झाल्यामुळे नवीन संसदेची गरज आहे. तसे तर जनतेसाठी ही संसद सुद्धा डुक्करखानाच आहे जिथे फक्त हवाई गोळे सोडले जातात आणि जनतेला लुटण्यासाठी नवनवीन कायदे बनवले जातात. परंतु जनतेची कमाई उधळण्यासाठी किती असत्य बोलले जाते हे समजण्यासाठी फक्त इतकेच जाणणे पुरेसे आहे की हे संसद भवन फक्त 94 वर्ष जुने आहे व अत्यंत मजबूत आहे. इंग्लंड आणि अमेरिकेचे संसद भवन ह्यापेक्षा बरेच जुने आहे. इंग्लंडचे संसद भवन बनून जवळपास 150 वर्ष तर अमेरिकेचे संसद भवन बनून 200 वर्ष होऊन गेलेले आहेत.

एका बाणात दोन पक्षी टिपणारा हा प्रकल्प वास्तवात 'सेंट्रल' भ्रष्टाचार प्रकल्प आहे. सरकारच्या आवडीच्या बिल्डर आणि कंपन्यांना हजारो कोटींचे ठेके मिळतील आणि मंत्री व नोकरशहांचीही पाचही बोटे तुपात असतील.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर संसद भवन व राष्ट्रपती भवनाच्या आसपास असणारी मोकळी जागाही नाहीशी होईल आणि जनतेला संसद भवनाच्या जवळ जाऊन विरोध-प्रदर्शन करणे अशक्यप्राय होऊन जाईल.

(जानेवारी 2021, मजदूर बिगुल मधून साभार)

अनुवाद: निखील

# अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर वाढते हल्ले, पत्रकारांचे दमन

पान 6 वरून

राजधानी दिल्लीसुद्धा यामध्ये मागे नाही आणि येथे काराव्हान मॅगझिन, इंडियन एक्सप्रेस वर्तमानपत्रांच्या वार्ताहरांना दडपशाहीला तोंड द्यावे लागले आहे. ऑगस्ट महिन्यात काराव्हानच्या तीन पत्रकारांना हल्ला, धार्मिक शिवीगाळ, खुन आणि बलात्काराच्या धमक्यांना तोंड द्यावे लागले. मे महिन्यात इंडियन एक्सप्रेसचे पत्रकार महिंद्र सिंह मन्राल यांना तबलिगी लोकांसंदर्भातील खोटा व्हिडिओ बनवल्याच्या बातमी संदर्भात चौकशीसाठी बोलावले गेले.

याचप्रकारे होत असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गळचेपीचा परिणाम आहे की 2021 मध्ये **जागतिक प्रसारमाध्यम स्वातंत्र्य निर्देशांकावर (ग्लोबल प्रेस फ्रिडम इंडेक्स) भारत जो अगोदरच 180 देशांच्या यादीत 140 व्या स्थानावर होता, त्याची 142 व्या स्थानावर** घसरण झाली आहे. या निर्देशांकाच्या दृष्टीने पाहिले तर भारताची सतत पिछेहाटच चालू आहे. 2002 मध्ये 80 व्या स्थानापासून आता 142 व्या स्थानावर भारत आला आहे.

या प्रकारच्या वाढत्या गळचेपीला आपण तेव्हाच समजू शकतो, जेव्हा आपण भांडवली व्यवस्थेचे खरे वर्गचरित्र समजून घेऊ. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दिखावा हा भांडवली लोकशाही मध्ये तोपर्यंतच असतो जोपर्यंत भांडवलदार वर्गासाठी नफ्याचा दर चढा असतो, आणि त्यांच्या राज्यसत्तेची पकड मजबूत असते. भांडवलशाहीमध्ये राज्यसत्ता ही भांडवलदार वर्गाच्या नफ्याच्या, खाजगी संपत्तीच्या अधिकाराच्या रक्षणासाठीच काम करत असते. **त्यामुळेच जेव्हा अर्थव्यवस्था संकटात येते तेव्हा लोकशाहीचा दिखावा सोडून व्यवस्था तिच्या दमनकारी रुपात विविध प्रकारे नागडेपणाने समोर येते.**

भांडवली व्यवस्था आपल्याच अंतर्गत अंतर्विरोधामुळे सतत आर्थिक संकटात सापडत जाते आणि कालागणिक हे संकटही तीव्र होत जाते. सतत येणाऱ्या मंदी, महामंदी, जीडीपी दरातील घसरण हे याचेच लक्षण आहे. आर्थिक संकट का येते हे समजले पाहिजे. कामगारांनी निर्मिलेल्या संपत्तीचा मोठा वाटा नफ्याच्या रुपाने हडपणारा भांडवलदार वर्ग एकीकडे भांडवल संचय वाढवत जातो, आणि कामगार वर्गाला गरीब करत जातो, परंतु त्याचवेळी यंत्रसामग्री मध्ये प्रचंड गुंतवणूक करून एकीकडे उत्पादनाला प्रचंड वाढवतोच, त्याचवेळी वाढलेल्या गुंतवणुकीमुळे नफ्याच्या घसरणीची शक्यताही निर्माण करतो. नफ्याचा दर घसरण्याची ही प्रवृत्ती जेव्हा सर्व अर्थव्यवस्थेमध्ये वास्तवात जोर धरू लागते, तेव्हा आर्थिक संकट आल्याची ओरड सुरू होते. जगाची अर्थव्यवस्था गेल्या अनेक दशकांपासून अत्यंत धिम्या गतीने वाढत आहे. भारतातही काही वर्षांच्या 'तेजी'नंतर 2010 पासूनच आर्थिक संकट तीव्र होताना दिसून येते. कोरोना काळात तर अर्थव्यवस्थेने 23 टक्के घट नोंदवली आणि अगोदरच निर्माण झालेल्या आर्थिक संकटाला गती दिली. या **संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग, नफ्याचा दर चढा ठेवण्याचा मार्ग, आता कामगारांच्या श्रमशक्तीच्या आत्यंतिक पिळवणूकीतूनच जाऊ शकतो. याकरिताच सुरू होते एकाधिकारशाही, बोनापार्टीस्ट, हुकूमशाही, फॅसिस्ट प्रवृत्तींचे भांडवलदार वर्गाद्वारे वाढते समर्थन, आणि राज्यसत्तेच्या दमनकारी चरित्र मध्ये वाढ.**

याच आर्थिक संकटाचा परिणाम म्हणून भारतात 2013 पासूनच आर.एस.एस. आणि त्याद्वारे पोसलेल्या हिंस्त्र जमातवादी संघटनांना बळ देण्याचे मोठे काम देशातील भांडवलदार वर्गाने चालू केले. बहुसंख्य टीव्ही चॅनेल्सचे मालक हे यामुळेच मोदी समर्थक आहेत, आणि या भांडवलदार मालकांनी दिलेल्या पगारावर जगणारे संपादक आणि पत्रकार हे मोदीभक्तीमध्ये लीन झालेले आहेत. यामुळेच **अर्णब गोस्वामी सारख्या दलाल पत्रकारांवर खुनासारखे गंभीर गुन्हे दाखल असूनही, गंभीर षडयंत्र मध्ये सामील असल्याचे पुरावे असूनही, त्याच्यासाठी सर्वोच्च न्यायालय सुद्धा तातडीने हालचाल करते परंतु इतर पत्रकारांना ना जामीन मिळतो ना सुनावणी.**

आर्थिक संकट आणि दमनकारी राज्यसत्तेचे हे नाते फक्त भारतातच नाही तर जगभरामध्ये दिसून येत आहे. पत्रकारांवर आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर होणारे हे हल्ले फक्त भारतातच नाहीत तर जगभरात वाढताना दिसून येत आहेत. उदाहरणार्थ, अमेरिकेत 2020 मध्ये 117 पत्रकारांना अटक झाली वा स्थानबद्ध केले गेले. हा आकडा 2019 च्या तुलनेत 12 पट जास्त आहे!

आर्थिक संकटाच्या परिस्थितीत कामगार वर्गाच्या, जनतेच्या वाढत्या असंतोषाला काबूत ठेवण्यासाठीच भांडवलदार वर्ग एकमुखाने अशा 'लोहपुरुषां'ना सत्तेवर बसवू पाहतो, जे जनतेचे दमन करण्यात अजिबात विचलित होणार नाहीत. कामगार कायद्यांची विल्हेवाट लावणारे, नोटबंदी, जीएसटी लादणारे नरेंद्र मोदी, भाजप, संघ परिवार भांडवलदारांच्या गळ्यातील ताईत आहेत ते यामुळेच. भाजप सारखे फॅसिस्ट पक्ष भांडवलदार वर्गाचे लाडके आहेत कारण फॅसिझमची विचारधारा अशा नृशंस, मानवद्रोही, लोकशाही विरोधी सत्ताधाऱ्यांनाच जन्माला घालत असते. भाजपशासित राज्यांमध्ये अशाप्रकारच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या दमनच्या घटनांचे असलेले मोठे प्रमाण तर याचे द्योतक आहेच, सोबतच काँग्रेस, तृणमूल सारख्या उदारवादी म्हणवल्या जाणाऱ्या पक्षांद्वारे शासित राज्यांमध्ये सुद्धा होत असलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे दमन व्यापकरित्या राज्यसत्तेच्या दमनकारी होत चाललेल्या चरित्राचेच लक्षण आहे.



# सर्व शेतकऱ्यांचे हित आणि मागण्या एक आहेत का?

पान 1 वरून

जेव्हा शेतीमध्ये उत्पन्न होणारे सर्व मूल्य (म्हणजे उत्पादनात बदललेले श्रम) शेतीच्या क्षेत्रातच राहिल, जे की साधारणत: अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांमध्ये मिळत असलेल्या सरासरी नफ्याच्या वरच असेल कारण तिथे शेतीच्या तुलनेने मशिन जास्त असतात आणि प्रति एकक मशीन कामगार कमी असतात. परिणामी शेतीमध्ये श्रमही जास्त सघन असते आणि मूल्यही जास्त निर्माण होते. याचा अर्थ असा की भांडवली जमिनदार जर एवढा खंड मागेल की भांडवली शेतकऱ्याकडे सरासरी नफ्याएवढेही शिल्लक राहणार नाही, तर भांडवली शेतकरी आपले भांडवल इतर कोण्या क्षेत्रात लावणे पसंद करेल आणि जर भांडवली शेतकरी शेतीच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये सरासरी नफ्याच्या वर मिळणाऱ्या 'अतिरिक्त नफ्या' ला खंडाच्या रुपात भांडवली शेतमालकाला देणार नाही, तर भांडवली शेतमालक आपली जमीन भांडवली शेतकऱ्याला देणारच नाही. अन्नधान्य आणि इतर शेती उत्पादनांची वाढती मागणी जमिनीच्या मर्यादित आकारामुळे असे होते की भांडवली शेतकरी जमीन भाड्याने घेतो, सरासरी नफा आपल्याकडे ठेवतो आणि 'अतिरिक्त नफा' कराच्या/खंडाच्या रुपाने भांडवली जमिनदाराला देतो. म्हणजेच भांडवली जमिनमालक मनमर्जी खंड घेऊ शकत नाही आणि हा खंड बाजाराच्या साठी उत्पादन, सरासरी नफ्याचा दर, शेतीमध्ये उत्पादकता अशा कारणांनी ठरत असतो. जिथे भांडवली शेतकरी स्वत:च जमिन मालक असतो, तिथे हा 'अतिरिक्त नफा' खंडाच्या रुपाने कोण्या भांडवली जमिनदाराकडे जात नाही तर स्वत:च्याच खिशात जातो. असो, तर असा आहे भांडवली खंड जो सामंती खंडापेक्षा वेगळा आहे. जेव्हा एकदा शेतीमध्ये भांडवली खंडाची सुरुवात होते, तेव्हा शेतीमध्ये उत्पादन संबंधांचे चरित्र मूळात आणि मुख्यत: भांडवली बनते आणि आपल्या देशामध्ये अनेक दशके अगोदर असे होऊन गेले आहे. भांडवलशाहीचा विकास झाल्या नंतर, शेतीमध्ये मोठे भांडवल छोट्या भांडवलाला गिळते, शेतमजूरांचे शोषण करते आणि त्यांच्या द्वारे पैदा झालेल्या वरकड मूल्याला नफ्यासाठी हडपते. भांडवली शेतकरी (धनिक शेतकरी) कोण असतो? भांडवली शेतकरी तो असतो जो भांडवल गुंतवून शेतीसाठी उपकरणे, मशिन, कच्चा माल इत्यादी विकत घेतो, मजुरांची श्रमशक्ती विकत घेतो आणि बाजारासाठी उत्पादन करवतो. मजुरांद्वारे निर्माण वरकड मूल्याला तो नफ्याच्या रुपाने खिशात घालतो, त्याच्या एका हिश्श्याचा उपभोग घेतो आणि नफा व बाजाराची स्थिती चांगली असेल तर पुन्हा शेतीमध्येच गुंतवतो किंवा इतर कोण्या क्षेत्रात गुंतवतो. जर त्याने जमीन एखाद्या भांडवली जमिनदाराकडून भाड्याने घेतली असेल तर तो शेतीमध्ये सरासरी नफ्याच्या वर मिळणाऱ्या वरकड नफ्याला भांडवली जमिनदाराला खंडाच्या रुपात देतो आणि जमीन त्याची स्वत:ची असेल तर तो हा वरकड नफा सुद्धा खिशात घालतो. ज्यांना आपण भारतात धनिक शेतकरी किंवा उच्च-मध्यम शेतकरी म्हणतो, ते हेच भांडवली कुलक-शेतकरी आहेत. ते साधारणपणे असे शेतकरी आहेत ज्यांच्याकडे 4 हेक्टर (10 एकर) किंवा त्यापेक्षा जास्त जमीन आहे. देशाच्या विविध राज्यांच्या स्थितींमध्ये काही फरक असला, तरी देशाच्या स्तरावर सध्या याच सरासरीने काम चालवले जाऊ शकते. यानंतर शेतकऱ्यांचा असा वर्ग येतो ज्याच्याकडे इतके भांडवल (आणि अनेकदा जमीनही) नसते की ते मोल-मजुरी करणाऱ्या मजुरांना कामावर ठेवतील, मोठ्या प्रमाणात मशिन, उपकरण, सुधारित बियाणे, खत, आणि शेतीमध्ये लागणाऱ्या इतर वस्तू घेतील. ते अपवादानेच दोन-चार मजुरांना कामावर ठेवतात आणि साधारणपणे स्वत:च्या आणि आपल्या परिवाराच्या श्रमानेच शेती करतात. त्यांच्याकडे, स्वत:च्या गरजांनंतर जास्त उत्पादन शिल्लक राहत नाही आणि ते थोड्याच उत्पादनाला सरकारी मार्केट मध्ये विकू शकतात. अनेकदा ते स्थानिक धनिक शेतकरी, आडते, मध्यस्थांनाच हे उत्पादन कमी किमतीत विकतात कारण उत्पादनाला ठेवण्याची सुविधा नसते आणि उधार वगैरे चुकवण्यासाठी लगेचच पैशांची गरज असते. हे शेतकरी बहुतेक मामल्यांमध्ये धनिक शेतकरी, कुलक, व्याजखोर, आडती (जो अनेकदा एकच व्यक्ती असतो!) यांच्या कर्जाखाली दबलेले असतात आणि अनेक प्रकारच्या आर्थिक बंधनांद्वारे त्यांच्यावर अवलंबून असतात. यामुळे सुद्धा कमी किमतीवर आपले उत्पादन या धनिक शेतकरी-कुलकांना विकण्यास त्यांचा नाईलाज असतो. शेतकऱ्यांच्या या हिश्श्याला आपण निम्न-मध्यम शेतकरी वर्ग म्हणतो. हे शेतकरी अनेकदा धनिक शेतकरी-कुलकांसाठी ठेकेदारी शेती सुद्धा करतात. या व्यवस्थेमध्ये किमान हमी भावाच्या पेक्षा कमी भावाने ते धनिक शेतकरी-कुलकांसाठी धान्य पिकवतात आणि विकतात. अनेकदा ते जमीन सुद्धा याच धनिक शेतकरी-कुलकांकडून भाड्याने घेतात. बहुतेक मामल्यांमध्ये या निम्न-मध्यम शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे चल भांडवल सुद्धा याच धनिक शेतकरी-कुलकांकडून व्याजाने मिळते आणि शेवटी ते आपले उत्पादन किमान हमी भावापेक्षा (आणि बाजारभावापेक्षा) कमी दराने याच धनिक शेतकरी-कुलकांना विकतात. धनिक शेतकरी-कुलक फक्त कॉर्पोरेट कंपन्यांनी ठेकेदारी शेतीमध्ये घुसण्याच्या विरोधात आहेत, ना की सर्वच ठेकेदारी शेतीच्या विरोधात. कारण ते स्वत:च गरीब शेतकऱ्यांकडून ठेकेदारीने शेती करवतात. म्हणजेच हे धनिक शेतकरी-कुलक, निम्न-मध्यम शेतकऱ्याला भांडवली जमिनदाराच्या रुपात खंड घेऊन, व्याजखोराच्या रुपाने व्याज घेऊन, भांडवली शेतकऱ्याच्या रुपाने नफा घेऊन आणि सोबतच आडत्या-मध्यस्थाच्या रुपाने कमिशन घेऊन लुटतात. याच निम्न-मध्यम मालक शेतकऱ्यांकडे आणि काश्तकारांकडे, दोघांकडेही इतकेही शिल्लक रहात नाही की ते आपल्या घराचा नियमित खर्च पण चालवू शकतील. परिणामी, यांच्याच घरांचे लोक प्रवासी मजूर म्हणून दुसऱ्या गावांमध्ये वा शहरांमध्ये जातात जेणेकरून घराची अर्थव्यवस्था चालू शकेल.

याच निम्न-मध्यम शेतकऱ्यांना पंजाब आणि हरियाणा मध्ये सरकारी मार्केट पर्यंत (एपीएमसी) बऱ्यापैकी पोहोच आहे कारण तेथे सरकारी मार्केटचे नेटवर्क बाकी देशापेक्षा जास्त चांगले आहे. पण त्यांच्याकडे विकण्यायोग्य उत्पादनाचे प्रमाण खूप जास्त नसते आणि वर्षभरात ते जेवढे धान्य हमीभावाला विकतात त्यापेक्षा जास्त विकत घेतात, त्यामुळे त्यांना हमीभाव वाढल्यामुळे फायदा नाही, उलट नुकसान होते. मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगाणा आणि केरळच्या काही निम्न-मध्यम शेतकऱ्यांची हमीभावापर्यंत पोहोच आहे, पण पंजाब व हरियाणा पेक्षा कमी. आणि बाकी राज्यांमध्ये तर हमीभाव आणि सरकारी मार्केट पर्यंत त्यांची पोहोच नगण्य आहे. पण जिथेही हमीभाव आणि सरकारी मार्केट पर्यंत त्यांची पोहोच आहे, तेथे सुद्धा हमीभावामुळे त्यांना नुकसानच जास्त होते कारण ते मुख्यत: शेती उत्पादनाचे खरेदीदार आहेत, विक्रेते नाही.

यानंतर त्या शेतकऱ्यांचा वर्ग येतो ज्यांना आपण सीमांत आणि छोटे शेतकरी, किंवा सरळ गरीब शेतकरी आणि अर्धसर्वहारा म्हणू शकतो. हे ते शेतकरी आहेत जे कधीही मजुरांचे शोषण करत नाहीत, उलट स्वत:च्या आणि आपल्या परिवाराच्या श्रमानेच शेती करतात आणि त्यांच्या मुलभूत गरजा सुद्धा पूर्ण होत नाहीत. असे शेतकरी एकूण शेतकरी लोकसंख्येच्या 92 टक्के आहेत. त्यांच्याकडे 2 हेक्टर (जवळपास 5 एकर) पेक्षाही कमी जमीन आहे आणि आपल्या शेतीसाठीच नाही तर दैनंदिन घरगुती गरजांसाठीही कर्ज घेण्याला त्यांचा नाईलाज असतो. त्यांनी इच्छा केली तरी ते कधी हमीभावाचा फायदा घेऊ शकत नाहीत. देशभरातील आकड्यांनुसार यांच्या कौटुंबिक उत्पन्नाचा फक्त 15 टक्के भाग शेतीतून येतो. आता तुम्ही स्वत:च समजून घ्या की हे किती उत्पादन कुठेही विकू शकतात, सरकारी मार्केट तर दूरची गोष्ट आहे. यांचे घर मुळातच मजुरीवर चालते कारण यांच्या कौटुंबिक उत्पन्नाचा 85 टक्के हिस्सा मजुरीतून येतो. या गरीब आणि सीमांत शेतकऱ्यांचे शोषण भांडवली शेतकरी आणि भूस्वामीच करतात आणि गावांमध्ये राहणारा कोणीही व्यक्ती या सत्याला ओळखतो मग कोणी यापासून कितीही तोंड का फिरवेना.

सर्वात खालच्या स्तरावर आहेत शेतमजूर. गावांमध्ये आता शेतमजुरांची संख्या एकूण शेतकरी लोकसंख्येपेक्षा (यात सीमांत, छोटे आणि निम्न-मध्यम शेतकरी सुद्धा सामील आहेत) जास्त आहे. 2011 मध्येच भारताच्या शेतीमध्ये गुंतलेल्या लोकसंख्येमध्ये 14.5 कोटी शेतमजूर होते, जेव्हा की शेतकऱ्यांची संख्या 11.8 कोटी राहिली होती. गेल्या 10 वर्षांमध्ये जर शेतकऱ्यांचे मजूर बनण्याचा दर जर तोच राहिला असेल, जो 2000 ते 2010 च्या दरम्यान होता, तर असे मानले जाऊ शकते की शेतमजुरांची संख्या 15 कोटींच्या वर गेली असेल, जेव्हाकी शेतकऱ्यांची संख्या 11 कोटींच्या खाली गेली असेल. या शेतमजूर लोकसंख्येचा किमान अर्धा हिस्सा दलितांमधून येतो. यांच्या शोषणाला अतिशोषणामध्ये बदलवण्यात त्यांच्या जातीय स्थितीचेही एक योगदान आहे. पंजाब आणि हरियाणा ते प्रदेश आहेत, जिथे दलित लोकसंख्या ही एकूण लोकसंख्येच्या 25 टक्क्यांपेक्षाही जास्त आहे. जर प्रवासी मजुरांना सोडले तर पंजाब आणि हरियाणाच्या गावांमध्ये शेतमजुरी करण्याचे काम मुख्यत: हाच जनसमुदाय करतो. पंजाब आणि हरियाणा मध्ये जेव्हा लॉकडाऊनच्या काळात प्रवासी मजुरांचे येणे थांबले होते, तेव्हा मजुरी वाढू लागली होती कारण श्रमाची मागणी वाढत होती. अशामध्ये पंजाब आणि हरियाणाच्या धनिक शेतकरी-कुलकांनी आपल्या पंचायती आणि खाप बोलावून शेतमजुरीवर एक वरची मर्यादा घालून दिली. कोणत्याही मजुराला यापेक्षा जास्त मजुरी देण्यास मनाई केली गेली. मागितल्यास त्याचा सामाजिक बहिष्कार होत होता. या मजुरांना आपल्या गावाबाहेर जाऊनही मजुरी करण्याची परवानगी नव्हती. आणि जोपर्यंत बिहार, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल, ओरिसा, छत्तीसगड, झारखंड मधून पंजाब, हरियाणाला जाणाऱ्या प्रवासी मजुरांची गोष्ट आहे, तर त्यांच्या शोषण आणि उत्पीडनात सुद्धा धनिक शेतकरी-कुलकांचा वर्ग कोणतीही कसर सोडत नाही.

हे आहे शेतीमध्ये लागलेल्या वर्गांचे एक विवरण: भांडवली जमिनमालक, भांडवली शेतकरी (मालक आणि भाडेकरू), निम्न-मध्यम शेतकरी, सीमांत आणि छोटे शेतकरी, आणि शेतमजूर. यानंतर आडते आणि व्यापाऱ्यांचाही वर्ग आहे ज्यांची भुमिका किमान पंजाबमध्ये तरी खुद्द भांडवली जमिनमालक आणि भांडवली शेतकरीच निभावतात.

### या वर्गांचे हित एकसारखे असू शकते काय काय ?

जोपर्यंत सरंजामशाही (सामंतवाद) होती आणि सामंती जमिनमालक वर्ग होता, तोपर्यंत धनिक शेतकरी, उच्च-मध्यम शेतकरी, निम्न-मध्यम शेतकरी, गरीब शेतकरी आणि शेतमजुरांचा एक सामाईक शत्रू होता. आज निम्न-मध्यम शेतकरी, गरीब शेतकरी आणि शेतमजुरांच्या वर्गाचा प्रमुख शोषक आणि उत्पीडक कोण आहे? तो आहे गावातील भांडवली जमिनमालक, भांडवली शेतकरी, व्याजखोर आणि आडते-मध्यस्थांचा पूर्ण वर्ग. या शोषक वर्गाच्या मागण्या आणि हित एकदम वेगळे आहेत आणि गावातील गरीब शेतकऱ्यांच्या मागण्या आणि हित एकदम वेगळे आहेत.

यामुळेच जेव्हाही कोणी तुमच्याशी "शेतकऱ्यांच्या हिताची" गोष्ट करेल, तेव्हा त्याला सर्वात पहिले विचारा: कोणता शेतकरी? मोल-मजुरी श्रमाचे शोषण करून, खंड वसूल करून, व्याज लुटून गरीब आणि निम्न-मध्यम शेतकऱ्यांना पिळून काढणारा धनिक शेतकरी आणि कुलक? किंवा 92 टक्के ते शेतकरी ज्यांच्या उत्पन्नाचा 50 टक्क्यांपेक्षाही जास्त भाग आता मजुरीतून येतो, ना की शेतीतून? या दोघांच्या मागण्या एक कशा असू शकतात? म्हणूनच आपण कामगार आणि गरीब शेतकऱ्यांनी हे सर्वात पहिले समजले पाहिजे की शेतकरी हा एक वर्ग नाही. अनेक भागांमध्ये वाटलेला तो समुदाय आहे, ज्याचे वेगवेगळे हित आणि वेगवेगळ्या मागण्या आहेत. एक शोषक आहे, तर दुसरा शोषित आहे.

देशाच्या एकूण शेतकऱ्यांपैकी फक्त 6 टक्के शेतकऱ्यांना लाभकारक मुल्याचा फायदा मिळतो. नक्कीच हे प्रमाण वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळे आहे. पण पंजाब मध्ये सुद्धा एक-तृतीयांश शेतकऱ्यांकडे 2 हेक्टरपर्यंतच जमीन आहे. तेथेही गरीब आणि सीमांत शेतकरी वर्गाला लाभकारक मूल्याचा फायदा यामुळे मिळत नाही कारण तो प्रामुख्याने अन्नाचा खरेदीदार आहे, विक्रेता नाही. पंजाबच्या शेतमजुरांना याचा फायदा तर होत नाहीच, उलट नुकसान होते. प्रवासी मजुरांनाही याचे नुकसान होते

पान 10 वर


# सर्व शेतकऱ्यांचे हित आणि मागण्या एक आहेत का?

पान 9 वरून

कारण त्यांच्यासाठी अन्नधान्य आणि शेतीवर आधारित इतर गोष्टी महाग होत जातात.

याचा फायदा मुख्यत: सर्वात मोठ्या आणि उच्च-मध्यम शेतकऱ्यांना होतो, जे पंजाब मध्ये एकूण शेतकरी लोकसंख्येच्या एक तृतीयांश आहेत. पंजाबमध्ये कुलक, धनिक शेतकरी, उच्च-मध्यम शेतकऱ्यांची घनता एकूण शेतकरी लोकसंख्येमध्ये देशाच्या तुलनेत जास्त आहे. याचे कारणे हे आहे की 'हरित क्रांती' दरम्यान भांडवली धनिक शेतकऱ्यांच्या एका पूर्ण वर्गाला राजकीय संरक्षण आणि समर्थनाने उभे करण्याचे काम इथेच केले गेले होते. दुसऱ्या क्रमांकावर या बाबतीत आहे हरियाणा. हमीभावाने होणाऱ्या एकूण खरेदीच्या जवळपास 70 टक्के याच दोन राज्यांमधून येते. म्हणजेच लाभकारक मूल्याच्या रुपाने कृत्रिम रुपाने जास्त नफ्याच दर येथीलच धनिक शेतकरी-कुलकांच्या वर्गाला दिला जात आहे आणि सरकारी खरेदी सुद्धा सर्वाधिक याच दोन राज्यांमधून होत आहे.

लाभकारक मूल्य किंवा किमान हमी भाव(एमएसपी) काय आहे? सरकारचा एक आयोग आहे ज्याला कृषी उत्पादनखर्च व किंमत आयोग (Commission for Agricultural Cost and Prices) म्हटले जाते. हा आयोग नियमित अंतराने शेतीमधील व्यापक उत्पादनखर्चाला ठरवतो ज्यामध्ये शेतीमध्ये लागणारे यंत्र, उपकरण, खत, बियाणे, मजुरीचा खर्च जोडले जाते, आणि मग शेतकरी परिवाराच्या सदस्यांचे श्रम (धनिक शेतकऱ्यासाठी हे बोनस आहे कारण त्याच्या कुटूंबातले लोक शेतावर काम करत नाहीत) जोडले जाते, व्याज आणि खंड जोडला जातो (जरी भारतात बहुतांश मामल्यांमध्ये जमिनीचे मालक स्वत: भांडवली धनिक शेतकरीच आहेत). याला संपूर्ण किंवा व्यापक उत्पादनखर्च म्हटले जाते आणि सरकार यावर 30 ते 50 टक्के जास्त सरकारी किंमत, म्हणजे हमीभाव ठरवते. म्हणजे उत्पादनखर्चाच्या वर 30 ते 50 टक्के पर्यंत नफा. या चढ्या सरकारी भावामुळे कमीत कमी तांदूळ, गहू, कापूस, मका आणि काही डाळींच्या बाजार किमती वर जातात. या त्या गोष्टी आहेत ज्यांना व्यापक जनसमुदाय नियमित रुपाने खाण्यापिण्यासाठी वापरतात. परिणामी अन्नावर व्यापक जनतेचा खर्च वाढतो, त्यांच्या पोषणाचा स्तर घसरतो, अन्य आवश्यक वस्तूंवर खर्च कमी होतो आणि एकूण त्यांच्या जीवनाचा स्तर खाली जातो. यासोबतच हमीभाव वाढल्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेला (रेशन व्यवस्था) सुद्धा फायदा नाही तर नुकसानच होते. भारतात अन्नधान्याचे मोठे रिझर्व भांडार असूनही मोठ्या संख्येने लोक उपाशी राहतात याचे कारणही हेच आहे की हमीभावावर सरकारी खरेदी नंतर सरकार सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे गरजूंपर्यंत पोहोचवण्याऐवजी भांडवलदारांना विकणे पसंत करते. याशिवाय, हमीभावामुळे बाजार किमती वाढतात आणि साठेबाजी यामध्ये अजून वाढ घडवते.



सोवियत रशियात बोल्शेव्हिक पार्टीच्या नेतृत्वात आणि लेनिनच्या कार्यादिशेनुसार बनलेल्या गरीब शेतकरी समित्यांसमोर नफेखोरी आणि साठेबाजी करणाऱ्या धनिक कुलक-शेतकऱ्याची पेशगी

यामुळे लाभकारक मूल्य वा हमीभाव हा सरळ-सरळ सामान्य शहरी आणि ग्रामीण मझुर, शहरी निम्न-मध्यमवर्ग आणि सोबतच सीमांत, लहान आणि मध्यम शेतकऱ्यांच्या हिताविरोधात आहे. लाभकारक मूल्याची मागणी मुळात आणि मुख्यत: धनिक शेतकरी-कुलक आणि उच्च-मध्यम शेतकऱ्यांचीच मागणी आहे. हे तथ्य आहे. पण सर्व कम्युनिस्ट या सत्यापासून तोंड फिरवत आहेत कारण त्यांना धनिक शेतकऱ्यांच्या आंदोलनात स्थान मिळवायचे आहे आणि त्यांच्या नेतृत्वाची शेपूट पकडून फरफटत जायचे आहे. यासाठी व्यापक कष्टकरी समुदायाच्या हितांना तिलांजली द्यायला त्यांना काहीच हरकत नाही.

***धनिक शेतकरी आणि कुलकांपेक्षा वेगळ्या अशा सीमांत , छोट्या आणि निम्न-मध्यम शेतकऱ्यांच्या काय मागण्या आहेत?***

धनिक शेतकऱ्यांच्या मागण्या आणि गरीब शेतकऱ्यांच्या मागण्या एक नाहीत. मग प्रश्न हा आहे की सीमांत, छोट्या आणि निम्न-मध्यम शेतकऱ्यांच्या, म्हणजे गरीब शेतकरी आणि अर्धसर्वहारांच्या वेगळ्या मागण्या काय आहेत?

सर्वात पहिले तर आपण विशिष्ट मागण्यांबद्दल बोलुयात.

विशिष्ट मागण्यांमध्ये सर्वात प्रमुख ही आहे की शेतीला दिल्या जाणाऱ्या सबसिडीचा मोठा हिस्सा शेतीमध्ये पायाभूत संरचना उभी करण्यावर खर्च केला जावा, ज्याचा सर्व गरीब शेतकरी वापर करतात, ना की लाभकारक मूल्यासाठी, ज्याचा लाभ फक्त 6 टक्के धनिक शेतकऱ्यांना मिळतो. उदाहरणार्थ, सर्व गरीब शेतकरी सिंचनासाठी मौसमी पाऊस आणि कालव्यांच्या जाळ्यावर अवलंबून आहेत. ज्यांच्याकडे या सुविधा नाहीत, ते धनिक शेतकऱ्यांकडून पंपसेट इत्यादी मार्फत सिंचनाची सुविधा भाड्याने घेतात आणि त्यामध्येही लुटले जातात.

1980 च्या दशकाच्या सुरुवाती अगोदर शेती सबसिडीचा मोठा हिस्सा हमीभावावर नाही तर कालवे इत्यादींच्या निर्माणावर खर्च केला जात होता. 1980 च्या दशकामध्ये कुलक-धनिक शेतकऱ्यांच्या राजकीय नेतृत्वाच्या दबावामध्ये भारतीय सरकारने लाभकारक मूल्यावर खरेदीचा खर्च सतत वाढवला, आणि शेतीच्या पायाभूत संरचनेवरचा खर्च कमी होत गेला. तो अगोदरच कमी होता, पण नंतर सुद्धा तो बराच कमी होत गेला. याचा सर्वाधिक वाईट परिणाम गरीब शेतकऱ्यांवर पडला. भांडवली फ्रेमवर्क मध्ये गरीब शेतकऱ्यांची एक दुसरी महत्वपूर्ण मागणी ही बनते की गरिबातील गरीब शेतकऱ्याची संस्थात्मक कर्जापर्यंत पोहोच असावी ही सरकारची जबाबदारी आहे. गरीब शेतकऱ्यांना बँका वगैरे कडून कर्ज न मिळाल्यामुळे त्या शेती मध्ये आवश्यक भांडवलासाठी धनिक शेतकरी-कुलकांवर अवलंबून राहतात. हे कर्ज अत्यंत अन्यायपूर्ण व्याजदरांवर दिले जाते. गरीब शेतकऱ्यांच्या मोठ्या जनसमुदायाचे जमिनीपासून उखडले जाणे आणि आत्महत्यांसाठी सुद्धा हे अन्यायपूर्ण कर्ज जबाबदार आहेत. आज संस्थागत कर्ज 30 टक्क्यांपेक्षाही कमी शेतकऱ्यांना मिळते आणि त्यामध्येही सर्वाधिक लाभ याच वरच्या 10 टक्के शेतकऱ्यांना मिळतो. जेव्हा एखादी कर्ज माफी होते, तेव्हा त्याचा लाभही याच धनिक शेतकऱ्यांना मिळतो. पण आपण कधी ऐकले आहे का की गावात व्याजखोरी करणाऱ्या एखाद्या धनिक शेतकऱ्याने, कुलकाने, आडत्याने गरीब शेतकऱ्याला वा अर्धसर्वहाराला कर्जमाफी दिली आहे?

एक दुसरी महत्वपूर्ण मागणी ही आहे की सरकार धनिक शेतकरी आणि सामान्यत: सर्व धनिक वर्गांवर प्रगतीशील कर लावेल आणि त्या आधारावर सर्व शेतकरी जनसमुदायाला योग्य दरांवर सरकारी माध्यमातून बियाणे, खते, इत्यादी उपलब्ध करवेल, वैज्ञानिक शेतीसाठी सरकारी प्रशिक्षणाची सोय करेल. भांडवली व्यवस्थेच्या चौकटीमध्ये या मागण्या गरीब आणि निम्न-मध्यम शेतकऱ्यांच्या महत्वपूर्ण मागण्या आहेत आणि त्यांना तात्कालिक रुपात सहाय्यही करतात. आम्ही इथे प्रगतीशील कर पद्धतीची मागणी यासाठी जोडली आहे कारण जर शेतीमध्ये उत्पादन खर्च कमी करण्याची मागणी केली तर ती व्यापक सर्वहारा जनसमुदायाच्या हिताविरोधात जाते. सरकार शेतीसाठी लागणाऱ्या उत्पादनांमध्ये गुंतलेल्या कामगार समुदायाची वास्तव सरासरी मजुरी कमी केल्याशिवाय वरील कार्य तेव्हाच करू शकते, जेव्हा ते धनिक शेतकरी-कुलक, भांडवलदारांच्या संपूर्ण वर्गावर प्रगतिशील कर लावेल.

या विशिष्ट मागण्यांशिवाय छोट्या, सीमांत, आणि निम्न-मध्यम शेतकऱ्यांची एक सामान्य मागणी आहे जी शेतमजूर आणि शहरी कामगार वर्गासोबत सामाईक आहे: रोजगार हमीची मागणी. 2012-13 च्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणातच निम्म्या शेतकऱ्यांनी म्हटले होते की छोट्या शेतीला काही भविष्य नाही आणि पहिली संधी मिळताच ते शेती सोडू इच्छितात. पण कायमस्वरुपी आणि सरकारी नोकरी शिवाय ते शेती सुद्धा सोडू शकत नाहीयेत.

हे खरे आहे की भारतात उत्पादकतेच्या स्तरानुसार एका मोठ्या कृषक जनसमुदायाची शेतीमध्ये काहीही आवश्यकता राहिलेली नाही, पण ते प्रच्छन्न बेरोजगारी, अर्धउपासमार आणि कर्जाच्या अवस्थेत तसेच जगत राहतात कारण त्यांच्याकडे इतर कोणताही पर्याय नाही. परिणामी, एका मोठ्या गरीब शेतकरी लोकसंख्येसाठी रोजगार हमी एक महत्वपूर्ण अधिकार आहे आणि त्यांची मागणी बनते की राष्ट्रीय रोजगार हमी कायदा बनवला जावा आणि 'कामाच्या अधिकाराला' कायद्याने बाध्य करण्यासाठी लढावे.

एक अजून महत्वपूर्ण सामान्य मागणी जी गरीब शेतकऱ्यांचीही मागणी आहे आणि संपूर्ण कामगार वर्गाचीही मागणी आहे, ती आहे सर्वकष सार्वजनिक वितरण प्रणालीची मागणी. भारतात सीमांत आणि गरीब शेतकरी परिवारांचे सरासरी मासिक उत्पन्न सहसा कामगारांच्या सरासरी उत्पन्नापेक्षाही कमी आहे. म्हणायला ते एका छोट्याशा जमिनीचे मालक आहेत, पण ही छोटी शेती त्यांना देत काही नाही, फक्त खात जाते. त्यांच्या घरातील काही प्रवासी मजूर बाहेर काम करून कमावून घरी काही पाठवतात, तर ते शेती आणि कर्जामध्ये चालले जाते. अशामध्ये, ही कुटुंब भयंकर अन्न असुरक्षेमध्ये जगतात. सर्वकष सार्वजनिक वितरण प्रणाली ही त्यांची एक महत्वपूर्ण सामान्य मागणी बनते.

या सर्व मागण्यांचा गरीब आणि निम्न-मध्यम शेतकऱ्यांमध्ये प्रचार केला गेला पाहिजे आणि त्यांना यावर धनिक शेतकरी आणि कुलकांपेक्षा स्वतंत्रपणे संघटीत केले गेले पाहिजे. पण त्यांना हे सुद्धा सांगितले गेले पाहिजे की भांडवली व्यवस्था असेपर्यंत जर या

पान 7 वर



# तुमच्या सदाचाराचा ऱ्हास

✍राहुल सांकृत्यायन

**1. व्यभिचार**

सद्-आचार म्हणजे थोर माणसांचे आचरण. थोर कोणाला म्हणले जाते? थोरांच्या कोटीमध्ये त्या गरिबाला मोजले जाऊ शकते का, ज्याला इमानदारीने मिळविलेल्या आपल्या कमाईस खाण्याचाही अधिकार नसून जो दाण्या-दाण्यासाठी मोताद आहे? नाही. इथे थोर म्हणजे जुने-नवे राजे, राजऋषी, मोठ-मोठ्या सम्राटांचे राज पुरोहित आणि गुरु-ऋषी-मुनी, ज्यांनी सदाचार प्रकट करणारे शास्त्र आणि स्मृती रचल्या आहेत. थोर म्हणजे पीर-पैगंबर, मूसादाऊद जे की स्वतः राजे किंवा शासक होते, किंवा दुसऱ्या कोणत्याही मार्गाने मोठ्या जन-धनाचे मालक बनले होते. अशा "थोर" व्यक्तींचं वागणं हे जगाचा सदाचार बनलेले आहे. त्यांचा सदाचार सुद्धा एकसारखा नाहीये. कुठे सोळा-सोळा हजार बायका कृष्ण आणि दशरथासारख्या सदाचाऱ्यांकडे होत्या असे सांगितले जाते. सुलेमान, दाऊद तसेच इतर पैगंबर सुद्धा या बाबतीत खूपच "उदार" होते. आज सुद्धा आपल्याकडे वाजिद अली शहांची कमतरता नाहीये. नुकतेच एक महाराज मेले आहेत, जे याबाबतीत दुसरे वाजिद अली शहाच होते. सत्य तर हे आहे की जर असे धनाढ्यच आमच्या सदाचाराचे आदर्श असतील तर असा सदाचार नसलेलाच बरा. एखादा पुरुष एक पत्नी असताना दोन-दोन, चार-चार आणि त्यापेक्षाही जास्त विवाह करू शकतो, तरी सुद्धा हिंदू आणि मुस्लिम धर्मानुसार त्याच्या सदाचारी असण्याबद्दल थोडीशीही शंका घेतली जाऊ शकत नाही. परंतु याच धर्मांनुसार ह्याच स्वातंत्र्याला धरून जर कोणत्याही स्त्रिने एकाच वेळी दोन पती केले तर तो दुराचार होईल. असं असलं तरीही जगात असेही देश आहेत जिथे एका स्त्रिने अनेक पती करणे जरासेही अनैतिक समजले जात नाही. तिबेटमध्ये ही प्रथा सामान्य आहे. तिथे चुकूनच एखादी स्त्री असेल जिचे अनेक पती नाहीत आणि ही बाब तर आपल्या जुन्या इतिहासात देखील आढळते. पाच नवरे असूनही द्रौपदी ही भारतातील प्रात:स्मरणीय पंचकन्यांपैकी एक होती. शेवटी यामध्ये कोणता सदाचार आहे? असे अनेक देश आहेत जिथे प्राचीन काळापासून ते आतापर्यंत बहुपती-बहुपत्नी विवाहाला योग्य मानले गेले आहे, आणि अनेक असे देश आहेत जिथे बहुपत्नी विवाहाला तितकेच अनुचित समजले जाते जितके बहुपती विवाहाला. युरोप, अमेरिका, जपान हे अशा देशांपैकीच आहेत. न्यायाच्या दृष्टीने पाहिल्यास हे स्पष्टपणे जाणवते की जर एका स्त्रिचे अनेक पती असणे अनुचित आहे, तर एका पुरुषाच्या अनेक पत्नी असणे सुद्धा तेव्हढेच अनुचित आहे. आज जिवंत असलेल्या प्रमुख धर्मामध्ये असा एकही धर्म नाही, की जो एक पती आणि एक पत्नी विवाहालाच फक्त योग्य ठरवतो तसेच दोन्ही प्रकारच्या बहुविवाहांना प्रतिबंध करतो.

परंतु हा लैंगिक सदाचार फक्त बाह्य बाब आहे. आतमध्ये डोकावून पाहिल्यास परिस्थिती अजूनच बिभत्स दिसून येते. प्रत्येक श्रीमंत आणि शक्तिशाली पुरुष प्राचीन काळापासून आजपर्यंत लग्नाच्या पत्नींशिवाय अनेक दास्या आणि रखेली ठेवत आलाय आणि वेश्यावृत्तीने तर धनाला सौंदर्य येते असे मानले जाते. जर पुरुष चंचल असेल तर तो मर्द बच्चा म्हणला जातो, परंतु 'वेश्या' शब्दाचे दूषण मात्र फक्त स्त्रिलाच लावले जाते. लहानपणापासूनच प्रत्येक माणूस तसेच प्राचीन काळापासून आपला समाज अशा वातावरणात वाढत आलाय, ज्यात पुरुषांसाठी नैतिकतेची जी कसोटी लावली जाते, तिच्यावर जेव्हा स्त्रिला तोलले जाते तेव्हा आपण आश्चर्यचकित होतो. संपूर्ण जगामध्ये 'सदाचार-सदाचार' ओरडले जात आहे. त्यामुळे भारतीयांनी असे



समजू नये की सदाचाराचा ठेका फक्त त्यांनाच मिळालेला आहे. युरोप, अमेरिका, आशिया सर्वच प्रदेशांमध्ये यावर जोर दिला जात आहे. धर्म आणि ईश्वरावर विश्वास ठेवणारे तर विशेष करून यासाठी आकाश-पाताळ एक करतात. परंतु सदाचाराचे जेव्हढे कमी पालन धर्मानुयायी आणि ईश्वरभक्त करतात, या नियमाची जितकी अवहेलना त्यांच्याकडे होते, तेवढी इतर जागी होत नाही. रशिया मधून धर्म आणि ईश्वराचे राज्य नष्ट झाले आहे. परंतु संपूर्ण जगामध्ये तुम्ही तोच असा एक देश पहाल की जेथून वेश्यावृत्ती संपूर्णपणे नष्ट झाली आहे. काय आपल्या देशामध्ये अशा सदाचाराची खिल्ली उडवणारे सर्वाधिक हिंदू-तीर्थ आणि हिंदू-मठ नाहीत? अयोध्येला जा आणि तिथल्या मोठ्यात मोठ्या अवतारी ईश्वरभक्त आणि सिद्ध महात्म्याला घ्या आणि ज्यांना मरून काहीच वर्षे झालेत त्यांच्याविषयी सुद्धा विचारा मग कळेल सदाचारा संबंधी कशा-कशा प्रकारचे भयानक घोटाळे तिथे होतात. या जागा नैसर्गिकच नाही, तर अनैसर्गिक व्यभिचाराचे सर्वात मोठे अड्डे आहेत. बाहेरून तेथे जाणारी भोळी-भाबडी जनता, ज्यांना ब्रह्मचर्य, सदाचाराची साक्षात मूर्ती समजून आपले तन-मन-धन अर्पण करते, तेच घृणास्पद कामुकतेचे साक्षात अवतार आहेत. अशा व्यक्तींच्या तोंडून ब्रह्मचर्य आणि सदाचाराचे मोठ-मोठे उपदेश ऐकून तर उपहासाने म्हणावे लागते — निर्लज्ज ते तुझा नाश होवो! साधू संन्यासांचे याबाबतीतील क्रियाशील विचार त्यांच्या श्रीमुखातून निघतात त्यापेक्षा एकदम वेगळेच आहेत.

भारतातील कितीतरी धार्मिक मंडळं गुप्त व्यभिचार सुकर व्हावा म्हणून बनली आहेत. अनेक भगवद्भवन आणि भजनाश्रम लोकांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले आहेत. भलेही संयुक्त प्रांतात जा वा गुजरातमध्ये किंवा पंजाब वा बंगाल पहा, भलेही नेपाळला जाऊन पहा, अथवा मद्रासला, घरोघरी मातीच्याच चुली आहेत, सर्व सापनाथ-नागनाथ एकसारखेच आहेत. सदाचाराबाबत जो जेवढा पतित आहे तो तेवढेच अधिक सुंदर अलंकारिक शब्दामध्ये त्यावर व्याख्यान देऊ शकतो. शहरे आणि देशांचे दर्शन करण्याची गरज नाही. तुम्ही जिथे आहात तिथेच घर आणि चार भिंतीच्या आत सभ्यता आणि दिखाऊपणाच्या पेहरावाला बाजूला सारून पहा. तुमच्या लक्षात येईल की ब्रह्मचर्य आणि सदाचाराचे नियम जितके कठोर बनविले आहेत, तितक्याच सहजतेने ते तोडले पण जातात. आपल्या एका महान राजकीय नेत्याचा ब्रह्मचर्यावर अतिशय भर आहे परंतु त्यांच्याकडे त्याच्या छत्रछायेखालील मोठ-मोठ्या अनुयायांनी ज्या पद्धतीने वारंवार ते तोडण्याच्याच नियमांचे पालन केले आहे, त्याने हेच सिद्ध होते की बांधाने एक थेंब पाणी सुद्धा अडविले जात नसेल तर अशा बांधाची गरजच काय?

खरे तर सदाचाराच्या बाबतीत आपला समाज "मनसि अन्यत वचसि अन्यत" (बोलायचे एक, आणि करायचे दुसरेच) चा पक्का अनुयायी दिसून येतो. आतील सर्व ढोंग पाहत किती तन्मयतेने याची धार्मिक चर्चा आपण आपापसात करतो? त्यावेळी लक्षात येते की , आपल्या समाजात या नियमांची अवहेलना करणारा कोणीच नाहीये! किंवा आपण कोणत्यातरी दुसऱ्याच विश्वात बसून चर्चा करत आहोत. निश्चितच जेव्हा आपण सत्य परिस्थिती बद्दल विचार करतो, तेव्हा लक्षात येते की आपल्या समाजामध्ये ब्रह्मचर्य आणि सदाचार एका मोठ्या भंपकतेशिवाय काहीच महत्व ठेवत नाहीत. आश्चर्य वाटते की हजारो वर्षांपासून आपल्या समाजाने अशा आत्मवंचनेचा जोरदार प्रचार करून कोणता हेतू साध्य केला? 'जितकं औषध घेतलं तेवढा आजार वाढत गेला' नुसार जेवढी शतके उलटत गेली तसा आपल्या नैतिकतेचा स्तर ढासळतच गेला आहे. परिमाणामध्ये नाही, त्यामध्ये तर देश-काळाच्या मानाने फरक पडलेला नाही; घृणास्पद प्रक्रियेमध्ये मात्र नक्की फरक पडलाय.

ज्या देशांमध्ये स्त्री-संबंधी संबंधावर अतिशय कमी बंधने आहेत तेथील लोक याबाबतीत जास्त अनुकरणीय वर्तन ठेवतात. नियम आणि निर्बंधांचा भडिमार आपल्याला दुसऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक करण्यात आपल्याला अधिक पटाईत बनविण्यास उपयोगी ठरला आहे. रोमन कॅथोलिक सारखे कित्येक धर्म अशा कुकृत्यांची कबुली देण्यावर खूपच जोर देतात. तिथे गृहस्थ स्त्री-पुरुष, साधू-साधूनी एखाद्या सन्माननीय व्यक्तीसमोर वेळोवेळी आपले अपराध मान्य करतात. कदाचित ही प्रथा यासाठी चालविली जाते की "बीजी ताही बिसारी दे, आगे की सुधी लेय" (झाले ते झाले, इथून पुढे सुधारू). पण याचा परिणाम काय होतो? सुरुवातीला एक-दोन वेळा गुन्हा स्विकारताना थोडीसा संकोच वाटतो, तोही हळूहळू कमी होतो. मानसशास्त्रज्ञ बरोबर सांगतात की स्त्री-संबंधी अपूर्ण इच्छा आणखी उग्र रूप धारण करत माणसाच्या अंतरंगी संधीच्या शोधात टपून राहतात. धर्मांनी सर्वांत जास्त ज्यावर जोर दिला आहे, त्याची अशा प्रकारची, सार्वदेशिक, सार्वकालिक, सार्वजनिक अवहेलना पाहून हेच म्हणावेसे वाटते की ह्या ढोंगापासून, थोतांडापासून काय फायदा?

आपल्या देशातील एक नावाजलेले व्यक्ती आहेत ते धर्माबद्दल खूपच आसक्ती दाखवतात. देवाचे नाव घेत आनंदाने नाचू लागतात आणि अशा कार्यक्रमांवर खूपच पैसे खर्च करत असतात. त्यांची अवस्था ही आहे, की जेव्हा ते लठ्ठ पगाराच्या नोकरीवर होते, तेव्हा कोणतेही काम लाच घेतल्याशिवाय करत नसत आणि स्त्रियांच्या बाबतीत सर्व नियम धाब्यावर बसविण्याची जणू काही ईश्वराकडूनच त्यांना आज्ञा मिळाली आहे.

एका प्रातःस्मरणीय राजाला मरून खूप दिवस

पान 6 वर

**लेखकाचा परिचय**

राहुल सांकृत्यायन (1893-1963) खऱ्या अर्थाने जनतेचे लेखक होते. ते आजच्यासारख्या तथाकथित प्रगतिशील लेखकांसारखे नव्हते, जे जनतेच्या जीवन आणि संघर्षापासून अलिप्त राहून आपापल्या महालांमध्ये बसून कागदावर प्रकाश टाकत असतात. जनतेच्या संघर्षाचे मोर्चे असोत वा सरंजामदार-जमीनदारांच्या शोषण-दमनाच्या विरूद्ध शेतकऱ्यांच्या संघर्षाचा लढा असो, ते नेहमीच पहिल्या फळीत उभे राहिले. अनेक वेळा तुरूंगात गेले, यातना सहन केल्या. जमीनदारांच्या भाडोत्री गुंडांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्लासुद्धा केला, परंतु स्वातंत्र्य, समानता आणि मानवी स्वाभिमानासाठी ते ना कधी संघर्षातून मागे हटले आणि ना कधी त्यांची लेखणी थांबली.

जगभरातील 26 भाषा अवगत असलेल्या राहुल सांकृत्यायन यांच्या अचाट बुद्धीचे अनुमान यावरूनसुद्धा लावता येऊ शकते की, ज्ञान-विज्ञानाच्या अनेक शाखा, साहित्याच्या अनेक प्रकारांमध्ये त्यांनी हातोटी मिळवली होती. इतिहास, तत्वज्ञान, पुरातत्वशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्य, भाषा-विज्ञान इ. विषयांवर त्यांनी अधिकारवाणीने लेखन केले. बौद्धिक गुलामी, तुमचे अध:पतन, पळू नका-जगाला बदला, तत्वज्ञान-संदर्भ, मानवसमाज, वैज्ञानिक भौतिकवाद, जय यौधेय, सिंह सेनापती, साम्यवादच का?, बावीसावे शतक इ. रचना त्यांच्या महान प्रतिभेची ओळख स्वत:हूनच करून देतात.

राहुल देशातील दलित-शोषित जनतेला हर-तऱ्हेच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी लेखणीचा हत्यारासारखा वापर करायचे. त्यांचं म्हणणं होतं की, "साहित्यकार जनतेचा जबरदस्त सहकारी, सोबतच तो त्यांचा नेता (पुढारी) आहे. तो सैनिक आहे आणि सेनापतीसुद्धा."

राहुल सांकृत्यायन यांच्यासाठी जीवनाचं दुसरं नाव गती होतं आणि मरण किंवा स्तब्धतेचं दुसरं नाव होतं गतिरोध. यामुळेच अगोदरच तयार असलेल्या मार्गावर चालणे त्यांना कधीही आवडले नाही. ते नव्या मार्गाचे संशोधक होते. परंतु फिरणे म्हणजे त्यांच्यासाठी फक्त भूगोलाची ओळख करून घेणे नव्हते. ते सुदूर देशांतील जनतेचं जीवन आणि त्यांच्या संस्कृतीशी, त्यांच्या जिजीविषेशी ओळख करून घेण्यासाठीचं फिरणं होतं.

समाजाला मागे ढकलणाऱ्या हरतऱ्हेच्या विचार, रूढी, मूल्ये, मान्यता-परंपरांच्या विरूद्ध त्यांचे मन अतिशय तिरस्काराने भरलेले होते. त्यांचं संपूर्ण जीवन आणि लिखाण याविरूद्ध विद्रोहाचं जितं-जागतं उदाहरण आहे. यामुळेच त्यांना महाविद्रोहीसुद्धा म्हटले जाते. राहूल यांची ही वेगळी रचना आजसुद्धा आपल्या समाजातील प्रचलित रूढी-परंपरांच्या विरूद्ध तडजोड विहीन संघर्षाची आरोळी आहे.

# पेट्रोल आणि डिझेलची अभूतपूर्व दरवाढ

# कामगार कष्टकऱ्यांच्या मेहनतीच्या लुटीवर भरत आहे सरकारी तिजोरी !

✍निखील

9 फेब्रुवारी रोजी पेट्रोलचे महाराष्ट्रातील किरकोळ बाजार मूल्य 93.50 रुपये तर डिझेलचे 84.00 रुपये इतके अतिप्रचंड झालेले आहे. एवढ्या मोठ्या दरवाढीचा बोजा मुख्यतः कामगार-कष्टकरी जनतेवर कसा टाकला जातो ते समजण्यासाठी आपण हे समजण्यापासून सुरुवात करूयात की देशात पेट्रोल किंवा डिझेलचे दर कसे ठरतात?

भारत आपल्या एकूण गरजे पैकी जवळपास 80 टक्के कच्चे तेल आयात करतो. आयात कच्च्या तेलाचे शुद्धीकरण करुन तेल कंपन्या (उदा. हिंदुस्तान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम, इत्यादी) डीलरला देतात. ह्यात शुद्धीकरण, वाहतूक, साठवणूक ह्या सर्व खर्चांची वाढ होते. डीलर मार्फत तेल किरकोळ बाजारात पोहोचते. ते सामान्य गिऱ्हाईकाला मिळण्याच्या आधी ह्यात सरकारांचे कर जोडले जातात. पेट्रोलियम पदार्थ जी. एस. टी. च्या परिघाबाहेर असल्यामुळे ह्यात केंद्राचा अबकारी कर व इतर अधिभार तसेच राज्य सरकारांचे वेगवेगळे मूल्यवर्धित कर (VAT) व अतिरिक्त कर जोडले जातात. सरकारच्या 'पेट्रोलियम प्लँनिंग अँड ॲनॅलिसीस सेल' च्या आकडेवारी वरून समजून घेऊ की पेट्रोल-डिझेल साठी आपण मोजलेल्या किमतींचा किती भाग कोणाकडे जातो. उदाहरणादाखल डिसेंबर 2020 मध्ये दिल्लीत जेव्हा पेट्रोल ची किरकोळ बाजार किंमत 82.34 रुपये होती त्यात पेट्रोल ची आधारभूत किंमत फक्त 26.71 रुपये प्रति लिटर (एकूण किमतीच्या फक्त 32 टक्के) होती आणि शुद्धीकरण खर्च व डीलर चा नफा 3.65 रुपये प्रति लिटर (4 टक्के) होता. पेट्रोलच्या किमतीत केंद्राचा 32.98 रुपये (40 टक्के) व राज्याचा 19 रुपये (23 टक्के) एवढा मोठा हिस्सा हा फक्त कर होता. म्हणजे "अंगापेक्षा बोंगा मोठा" असा एकूण किमतीच्या 63 टक्के एवढा प्रचंड हिस्सा ह्या काळात सरकारं कर म्हणून आपल्या खिशातून वसूल करत होते. तीच स्थिती आज फेब्रुवारी मध्ये अजून बिकट बनलेली आहे. 'बहोत हुई महँगाई की मार' म्हणत मोदी सत्तेत आल्या नंतर केंद्राकडून घेण्यात येणाऱ्या कराने 14 टक्यांपासून 40 टक्यांपर्यंत मजल मारली आहे.

महाराष्ट्राच्या पातळीवर महाविकास आघाडी सरकारही सामान्य जनतेवर महागाईचा भार टाकण्यात कुठेही मागे नाही. राज्य सरकार आज मुंबई, ठाणे व नवी मुंबई भागात पेट्रोल वर आधारभूत किमतीच्या 26 टक्के मूल्यवर्धित कर (VAT) तसेच 10.12 रुपये प्रति लिटर अतिरिक्त कर घेत आहे; तसेच डिझेल वर आधारभूत किमतीच्या 24 टक्के मूल्यवर्धित कर (VAT) आणि 3.00 रुपये प्रति लिटर अतिरिक्त कर घेत आहे. तसेच उर्वरित महाराष्ट्रात पेट्रोल वर 25 टक्के मूल्यवर्धित कर (VAT) आणि 10.12रुपये प्रति लिटर अतिरिक्त कर व डिझेल वर आधारभूत किमतीच्या 21 टक्के मूल्यवर्धित कर (VAT) आणि 3.00 रुपये प्रति लिटर अतिरिक्त कर घेत आहे. त्यामुळेच "आपण हसे लोळायला, शेंबूड आपल्या नाकाला" ची स्थिती होऊ नये म्हणून महा विकास आघाडी सरकारही पेट्रोल-डिझेल दरवाढी बद्दल चिडीचूप आहे.

### कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या म्हणून देशात पेट्रोल-डिझेलचे भाव वाढले आहेत का?

अजिबात नाही. वर सांगितल्या प्रमाणे देशातील कच्च्या तेलाच्या गरजेचा 80 टक्के हिस्सा भारतात आयात करावा लागतो. भारतातील कच्च्या तेलाच्या किमती 'दुबई आणि ओमान क्रूड' आणि 'ब्रेंट क्रूड' ह्यांच्या किंमतीं नुसार ठरतात. यालाच 'इंडियन बास्केट' ची किंमत म्हणतात. लेखाची मर्यादा लक्षात घेऊन आपण, ह्या किमतीही ओपेक (OPEC) सारख्या जगभरातील बड्या तेल कंपन्यांच्या हितसंबंधी गटांद्वारे (कारटेल्स) कशा जास्तीत जास्त नफ्यासाठी कृत्रिम रित्या फुगवल्या जातात, मागणी-पुरवठा कसा कृत्रिम रित्या नियंत्रित करण्यात येतो, अशा बाबी सोडून देऊ. सध्यासाठी आपण हेच बघू की खरंच फक्त कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये वाढ झाल्यामुळेच देशात पेट्रोल-डिझेलच्या किमतीत वाढतात का?

| वर्ष | इंडियन बास्केट (सरासरी -डॉलर/बॅरल) | पेट्रोल किंमत (सरासरी -रुपये/ लिटर) | डिझेल किंमत (सरासरी -रुपये/ लिटर) |
|---|---|---|---|
| 2013-14 | 105.52 डॉलर | 69.75 रु | 51.96 रु |
| 2014-15 | 84.16 डॉलर | 66.37 रु | 53.58 रु |
| 2015-16 | 46.17डॉलर | 61.58 रु | 47.01 रु |
| 2016-17 | 47.56डॉलर | 64.61 रु | 53.24 रु |
| 2017-18 | 56.43 डॉलर | 66.94 रु | 56.13 रु |
| 2018-19 | 69.88 डॉलर | 82.09 रु | 70.45 रु |
| 2019-20 | 60.47डॉलर | 77.29 रु | 68.35 रु |
| 2020-21 | 48.94 डॉलर | 83.42 रु | 73.86 रु |
| (जानेवारी 21 पर्यंत) | 54.79डॉलर | 91.90 रु | 82.84 रु |


भारतात पेट्रोल-डिझेल च्या किमतीं ठरवण्याचे काम आधी केंद्र सरकार करत असे जे आता ऑईल मार्केटिंग कंपन्यांच्या हितासाठी अनियंत्रित करण्यात आले आहे. हे काम पेट्रोल च्या बाबतीत 2010 तर डिझेल च्या बाबतीत 2014 मध्ये करण्यात आले. त्यामुळे ह्या कंपन्या जवळपास दररोज कच्च्या तेलाच्या भावाप्रमाणे किमतींमध्ये बदल करण्याचा दावा करतात. ठोस आकडे बघून ह्याचे विश्लेषण करूयात. वर उल्लेखल्याप्रमाणे भारतामध्ये कच्च्या तेलाचा जो भाव गृहीत धरला जातो, त्याला 'इंडियन बास्केट' संबोधले जाते. तक्त्यामध्ये इंडियन बास्केट नुसार दरवर्षी कच्च्या तेलाचे दर आणि त्याच वेळी असलेले पेट्रोल आणि डिझेलचे दर दिले आहेत. हे लक्षात घ्या की कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल आहेत (1 बॅरल म्हणजे जवळपास 158 लिटर), तर पेट्रोल डिझेलच्या प्रति लिटर. परंतु आपल्याला इथे कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ उतारांचे पेट्रोल-डिझेलच्या किमतीतील चढ उताराशी नाते महत्वाचे आहे.

याशिवाय खाली दिलेल्या तक्त्यामध्ये कच्च्या तेलाचे दर आणि पेट्रोलचे दर यांची तुलना केलेली आहे. तुटक रेषेने इंडियन बास्केटची म्हणजे कच्च्या तेलाची किंमत डॉलर प्रति बॅरल मध्ये तर ठळक रेषेने पेट्रोलची किंमत रुपये प्रति लिटर मध्ये दर्शवलेली आहे ('The Hindu' पेपर मधून साभार) .

वरील आकड्यांवरून काही गोष्टी स्पष्ट होतात त्या खालील प्रमाणे आहेत:

1. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती कमी सुद्धा होतात परंतु भारतात पेट्रोल व डिझेलच्या किमती बहुतांशी जैसे थे राहतात किंवा तुलनात्मक रित्या कमी करण्यात येत नाहीत. हे काम त्या काळात सरकारचा कर वाढवून करण्यात येते.

2. कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या तर मात्र लगेच पेट्रोल डिझेल चे भावही त्या प्रमाणात वाढवण्यात येतात.




3. भाजपा सरकार सत्तेत आल्या पासून 2013 च्या तुलनेत 2021 पर्यंत इंडियन बास्केट मध्ये कच्च्या तेलाच्या किमती 20 डॉलर ते 50 डॉलर प्रति बॅरल नी कमी झालेल्या असतांना सुद्धा ह्याच काळात पेट्रोल ची किंमत जवळपास 22 रुपये तर डिझेल ची किंमत जवळपास 30 रुपये पर्यंत वाढवली आहे. लॉकडाऊन च्या काळात तर इंडियन बास्केटचे मूल्य 20 डॉलर पर्यंत खाली गेले होते तरी ह्या काळात पेट्रोल व डिझेल च्या किमती कमी होणे तर सोडा सतत वाढत राहिल्या आहेत.

ह्यातून हे स्पष्ट होते की सरळ कच्च्या तेलावर वाढलेल्या किमतींचे खापर फोडणे म्हणजे शुद्ध फसवणूक आहे. वाढलेल्या किमतींचा सर्वात मोठा हिस्सा वाढलेल्या सरकारी कराचा असतो.

### परंतु मग महत्वाचा प्रश्न हा आहे की सरकारं हे करतात तरी कशासाठी?

2008 ची जागतिक मंदी 2012-2013 पर्यंत भारतात पोहोचली होती. मंदीमध्ये मालकवर्गाचा नफ्याचा दर टिकवण्यासाठी भांडवली सरकारं प्रत्यक्ष करात कपात करतात आणि अप्रत्यक्ष करात वाढ. प्रत्यक्ष करात ते कर येतात जे मुख्यत: मालक वर्ग तसेच उच्च मध्यम वर्गावर लावले जातात जसे की आयकर, कॉर्पोरेट कर, संपत्ती कर, इस्टेट कर इ. अप्रत्यक्ष करात ते कर येतात जे वस्तू आणि सुविधांवर लावले जातात. अप्रत्यक्ष कर गरीब विरोधी असतात कारण की ते सर्वांसाठी सारख्याच दराने असतात आणि म्हणूनच गरिबांच्या तुटपुंज्या कमाईचा एक भाग या करांसाठी गेल्यावर गरिबांना या करांचा मोठा फटका बसतो.

जनतेवर कराचा बोजा वाढवण्याचे काम, संकटाच्या काळात भांडवलदार वर्गासाठी मोदी सारखा 'पोलादी पुरुष' जास्त चांगल्या पद्धतीने करू शकतो व करतो आहे. मोदी सरकारच्या मागील 6 वर्षात प्रत्यक्ष कराच्या तुलनेत अप्रत्यक्ष कर चांगलेच वाढवण्यात आलेले आहे. जसे की आर. बी आय. च्या आकडेवारी नुसार 2014-2015 मध्ये 8.00 लाख कोटी रुपये प्रत्यक्ष कर तर 12.17 लाख कोटी रुपये अप्रत्यक्ष कर, 2015-2016 मध्ये 8.30 लाख कोटी रुपये प्रत्यक्ष कर तर 14.67 लाख कोटी रुपये अप्रत्यक्ष कर, 2016-2017 मध्ये 09.60 लाख कोटी रुपये प्रत्यक्ष कर तर 16.62 लाख कोटी रुपये अप्रत्यक्ष कर, 2017-2018 मध्ये 11.29 लाख कोटी रुपये प्रत्यक्ष कर तर 18.84 लाख कोटी रुपये अप्रत्यक्ष कर , 2018-2019 मध्ये 12.97 लाख कोटी रुपये प्रत्यक्ष कर तर 21.97 लाख कोटी रुपये अप्रत्यक्ष कर जमा करण्यात आला. म्हणजे एकूण कराच्या जवळपास 60-65 टक्के हिस्सा सामान्य जनतेच्या खिशाला कात्री लावून जमवण्यात येतो. सामान्य जनतेवरील अप्रत्यक्ष कर वाढवण्याच्या ह्याच काळात सरकारने कॉर्पोरेट टॅक्स मात्र 35 टक्के वरून 25 टक्के वर आणला.

पेट्रोल-डिझेल च्या दरवाढी चा सर्वात मोठा फटका कामगार वर्गाला बसतो. कारण इंधन दरवाढीमुळे सर्व जीवनावश्यक जिन्नसींचे भाव वाढतात. सर्वसाधारण महागाईचे एक महत्वाचे कारण हेच आहे की इंधन संपूर्ण उत्पादनात कच्च्या मालाचा भाग असते आणि सोबतच इंधन दरवाढीमुळे सर्व प्रकारच्या पक्क्या मालाच्या वाहतुकीचा खर्चही वाढतो. सर्वसाधारण महागाई वाढीचा परिणाम असा होतो की कामगारांची मजुरी पैशाच्या स्वरूपात स्थिर असली तरी त्याच पगारात विकत घेऊ शकणाऱ्या वस्तुंची संख्या कमी झाल्यामुळे वास्तव मजुरी कमी होते.

आज अभूतपूर्व महागाईच्या काळात कामगार वर्गाने सर्व प्रकारचे अप्रत्यक्ष कर संपवून प्रत्यक्ष कर वाढवण्यासाठी तसेच वास्तव मजुरी टिकवण्यासाठी व वाढीसाठी लढण्याची गरज आहे. कामगार-कष्टकरी वर्गाने ह्या महागाईला आव्हान द्यायचे असेल तर पेट्रोल वरचा केंद्र व राज्य सरकारचा कर रद्द करवण्यासाठी व वेतन वाढीसाठी संघर्ष उभा करण्याची गरज आहे.

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित